# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ३१/०८/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक ३१/०८/२००६ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. २५/०८/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ४) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ५) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ६) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ७) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ८) | श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ९) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १०) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| ११) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १२) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १३) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ३) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती सो.**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो. आणि सभेला सुरुवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९० चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आज दि. ३१/८/२००६ रोजी शहरामध्ये श्री गणरायाचे गुण्यागोविंदाने वाजतगाजत स्वागत झालेले आहे. आज स्थायी समितीचे मा. सभापती श्री. तुळशीदास म्हात्रेसाहेब यांच्या एक वर्षाच्या कालावधीतील शेवटची सभा आहे. गेल्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये मा. सभापतीसाहेबांनी मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या विकासात्मक कामासाठी बऱ्याचशा कामांना मंजुरी देउन बऱ्याचशा कामांची महापालिकेमध्ये पुर्तता झालेली आहे. सर्व सदस्यांना सांभाळून घेउन म्हणजेच मिरा - भाईंदर महानगरपालिकेमध्ये असलेल्या सर्व सन्मा. सदस्यांच्या कामाची त्यांच्यापरिने त्या-त्या वॉर्डातील कामांकडे जातीने लक्ष देउन पुर्तता केलेली आहे. जी काही उर्वरीत कामे असतील ती कामे आमचे येणारे मा. सभापतीसाहेब पूर्ण करतील परंतु, त्यापूर्वी आमच्या आजच्या शेवटच्या सभेसाठी मी मा. सभापती साहेबांना हार्दिक शुभेच्छा देतो. त्याचबरोबर आमच्या सर्व स्थायी समितीच्यावतीने त्यांचे अभिनंदन करतो व भावी मा. सभापतींना पुढच्या मिटींगमध्ये येण्यासाठी आताच शुभेच्छा देतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**जयंत पाटील :-**

श्री. तुळशीदास म्हात्रेसाहेबांची निर्णय घेण्याची ही शेवटची सभा आहे असे मला वाटते. आता पुन्हा मा. सभापतीसाहेबांनी त्यांच्या कालावधीमध्ये सर्व सन्मा. सदस्यांना अतिशय चांगली वागणूक दिलेली आहे. आता शिवसेनेचे सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी निविदांना मंजुरी देणेबाबत सांगितले परंतु, फक्त

निविदांनाच मंजुरी दिलेली नाही. इतर समाजोपयांगी कामांनासुद्धा मंजुरी दिलेली आहे आणि याचा संपुर्ण शहरावर चांगल्या तऱ्हेने परिणाम झालेला आहे. या शहराला चांगला मेसेज मिळालेला आहे अशी कामे त्यांनी केलेली आहेत. फक्त एकाच गोष्टीची कमतरता ह्याच्यामध्ये आहे त्यांनी वेळेवर यावे एवढीच माझी अपेक्षा आहे. त्यांनी जो मधला काळ घालवला तो तसा पुढे न घालवता पुढच्या आयुष्याचे जे काही दिवस राहिलेले आहेत. श्री. तुळशीदास म्हात्रे यांनी वेळेचे भान राखावे असे माझे म्हणणे आहे. मी त्यांना भविष्य काळासाठी शुभेच्छा देतो. त्यांनी भविष्यकाळामध्ये या शहराचे महापौर व्हावे अशी माझी त्यांना सदिच्छा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मघाशी सन्मा. सदस्य रतन पाटील आणि ज्येष्ठ सदस्य जयंत पाटील यांनी मा. सभापतींना शुभेच्छा दिलेल्या आहेत. मी भारतीय जनता पार्टीच्यावतीने आजच्या सभेचे अध्यक्ष तसेच स्थायी समितीचे सभापती यांची आज शेवटची सभा आहे असे म्हटले जाते किंवा मा. सभापती साहेब ही शेवटची सभा आहे असे म्हणतात. मला सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे यांचा कमी कालावधी लाभलेला आहे. परंतु, त्यांच्या कामाची पद्धत भारतीय जनता पार्टीला नवीन नाही. त्यांचे आणि आमचे गेल्या अनेक वर्षापासुन खेळीमेळीचे नाते आहे. अजुन जर ते असते तर आंम्हाला आणखी एक वर्ष जुगलबंदी करायला मिळाली असती असे मला वाटते आणि मला याचा खेद आहे. कारण आज आम्ही या समितीमध्ये सदस्य पदावर आलेले आहोत आणि ते निवृत्त होत आहेत. तरीसुद्धा कामकाज आणि समोरच्या माणसाला सांभाळून घेण्याचा खेळकरपणा ह्या वृत्तीची आवश्यकता असते. ह्या सभागृहामध्ये महासभेमध्ये किंवा अन्य कुठेही अशी वृत्ती असु दे. ज्या ठिकाणी सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रेसाहेब असतात. त्या ठिकाणी खेळीमेळीचे वातावरण असते. त्यांनी ते वातावरण टिकवले असेल. शेवटच्या तीन सभांमध्ये ते वातावरण टिकवले असल्याचे दिसुन आलेले आहे. त्यांनी त्यांच्या परिने न्याय द्यायचा प्रयत्न केला असे आपण म्हणूया. मी असा सल्ला देणार नाही की त्यांनी वेळेचे बंधन पाळावे. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे याच्यापुढचे कामकाज व्यवस्थित सांभाळतील अशी आशा बाळगतो आणि पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीच्यावतीने तसेच व्यक्तीशः त्यांचे अभिनंदन करतो. जरी मी पुर्वी या सभागृहात नसलो तरी निवृत्त झालेले दोन सदस्य सांगत होते की सन्मा. सदस्य तुळशीदास म्हत्रे यांना एखादा विषय पटला तर ते तो विषय खेळीमेळीच्या वातावरणात पूर्ण करतात. मी पुन्हा एकदा त्यांचे अभिनंदन करतो. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हत्रे यांनी महापौर होण्याबाबत जशी अपेक्षा केली तशी मीसुद्धा याठिकाणी अपेक्षा बाळगतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने खुलासा करु इच्छितो की याठिकाणी विविध पक्षाच्या ज्येष्ठ सदस्यांनी मा. सभापतीसाहेबांच्या शेवटच्या बैठकीच्या अनुषंगाने विचार व्यक्त केलेले आहेत. मी प्रशासनाचा प्रतिनिधी या नात्याने मा. सभापती श्री. तुळशीदास म्हात्रेसाहेब यांनी गेल्या वर्षभरात स्थायी समितीच्या माध्यमातून विविध प्रश्नाचे आकलन करणे व त्यावर निर्णय देणे व त्यांचा सामाजिक जीवनातील अनुभव विचारात घेउन सर्व सदस्य व प्रशासन यांना समजावून घेउन याठिकाणी कामकाजाचा निर्णय देत असतांना मी त्यांना पाहिलेले आहे. एक उत्कृष्ठ अशा खेळीमेळीच्या वातावरणात त्यांनी सभेचे कामकाज चालविलेले आहे. सार्वजनिक जीवनात काम करित असताना आपल्याला सर्वच विचार पटतात असे नसते. परंतु, त्यांनी सर्वांना विश्वासात घेउन व प्रशासनाला समजावून घेउन हे काम केलेले आहे. आम्ही आतापर्यंत जे काम पाहिलेले आहे. त्याच्यामध्ये ही गोष्ट महत्त्वाची आहे. भविष्यात निश्चितच निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांची प्रगती व्हावी. परमेश्वरांने त्यांना चांगली संधी द्यावी अशी अपेक्षा व्यक्त करुन मी त्यांचे आभार मानतो.

**मा. सभापती सो :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी आजच्या या बैठकीमध्ये माझे मनःपूर्वक स्वागत केलेले आहे. आपण सर्वांनी मला वर्षभरात चांगल्या तऱ्हेने सहकार्य केले आणि या शहरात विकासाची भर पडण्यासाठी मोलाचे सहकार्य केल्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो. आपण अशा तऱ्हेने मला सांभाळून घेतल्याबद्दल आपले आभार मानून विषय संपवते. जय हिन्द, जय महाराष्ट्र.

**रतन पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो की, बऱ्याच वेळेला मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या मागच्या सभेमध्ये असे ठराव झाले की काही जागा, शाळा, शाळेची मैदाने किंवा शाळेमधील हॉलबाबत ठराव झालेला आहे. आपण भाईंदर (पूर्व) ला खारीगांव शाळा क्र. ६ येथे जो हॉल बांधलेला आहे. तो हॉल आता बंद केलेला आहे. या ठरावात शाळा, इमारती असे स्पष्टपणे लिहिलेले आहे. परंतु, त्याच्यामध्ये हॉलचा उल्लेख नाही. शाळेच्या पटांगण किंवा शाळेलगतच्या हॉल भाडयाने देउ नये असा ठरावात नाही. हा निर्णय मागच्या स्थायी समितीमध्ये घेतलेला होता. त्याच्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. आपण हॉलच्या संदर्भात अशी अट घालू नये असे मला वाटते. आपण छोट्या-मोठ्या लोकांसाठी हॉलच वापरु शकतात. कारण आपल्या विभागात लहान-मोठी कार्ये होत असतात. नाहीतर, तुम्ही शैक्षणिक चालू दिवसामध्ये काहीतरी ठरवू शकतात. परंतु, आपण कायमस्वरुपी शाळेचा हॉल बंद करणार म्हणजे आपण महापालिकेचे आर्थिक नुकसान करित आहोत. त्यामुळे आताच ठराव पारित करुन घ्या किंवा पुढे येणाऱ्या कालावधीमध्ये सदर विषय आणा.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी तो विषय कोणत्या कारणास्तव नाकारला? हे समजले पाहिजे. त्याबाबत अधिका-यांनी कोणती भुमिका घेतलेली होती. त्या अधिका-यांना कोणी निर्देश दिले का?

**मा. सभापती सो. :-**

आपला शाळेच्या मैदानाबाबत विषय होता.

**जयंत पाटील :-**

एकदा ठराव झाल्यानंतर तुंम्हाला तो ठराव तीन महिन्याच्या अगोदर रद्द करता येणार नाही ही याच्यामध्ये कायदेशीर बाब आहे.

**रतन पाटील :-**

आपण आता अटी घालून हा विषय नंतर घेउुया.

**दिपक खांबित :-**

आपले जे ठराव आहेत. त्याच्यामध्ये शाळेचे मैदान शैक्षणिक कार्यक्रमाच्या व्यतिरिक्त कोणालाही भाड्याने देउु नये असा स्थायी समितीने निर्णय घेतलेला होता. आपल्याला त्याप्रमाणे ठरावाची अंमलबजावणी करावी लागेल असे निर्देश द्यावे लागतील. खारीगावचा हॉल शाळेमधेच आहे.

**जयंत पाटील :-**

तो हॉल शाळेमधेच आहे. तुमचा उद्देश अगदी वाईट नाही.

**रतन पाटील :-**

आपली विटंबना होते.

**रोहीदास पाटील :-**

जिथे शाळेचा वर्किंग अवर असतो. त्यावेळेला शाळेच्या आवरात कार्यक्रम ठेवला तर त्याच्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होते हे पाहणे महत्त्वाचे नाही. परंतु, कुठलीही शाळा डिस्टर्ब होता कामा नये हे महत्त्वाचे आहे अशी आपण सर्वांची भुमिका असायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

मी तुंम्हाला त्या संदर्भात सांगतो कि, चालू शैक्षणिक दिवसामध्ये सदर हॉलला परवानगी देउु नये असे काहीतरी धोरण ठरवा.

**दिपक खांबीत :-**

आपल्याला सदर विषय पुन्हा आणावा लागेल.

**रतन पाटील :-**

हा विषय पुन्हा आणा.

**जयंत पाटील :-**

आपल्याला हा विषय तीन महिन्यानंतर पुन्हा आणावा लागेल.

**रतन पाटील :-**

जर तुम्हाला या विषयाबाबत काही धोरण ठरवायचे असेल तर ठरवा आणि हा विषय तीन महिन्यानंतर पुन्हा आणा ह्या ठरावामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा इमारती भाडयाने देणेबाबत असा उल्लेख केलेला आहे. परंतु, ह्याच्यामध्ये हॉलचा उल्लेख केलेला नाही.

**दिपक खांबीत :-**

परंतु, तो शाळेचा हॉल आहे.

**जयंत पाटील :-**

तो हॉल शाळेचा आहे.

**रतन पाटील :-**

श्री. दिपक खांबीत साहेब, मी मागच्या वेळेला तुमच्याशी या संदर्भात बोललेलो होतो की आपल्याला नगरभवनचा हॉल चांगल्या पध्दतीने उत्पन्न मिळवून देतो. शिवाय, तो हॉल कधीही रिकामी नसतो. त्या हॉलची सामान्य लोकांना आवश्यकता असते. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये मुंबईवरुन इकडे येणारे जे काही नागरिक आहेत. ते सर्व सामान्य नागरिक आहेत. त्यामुळे त्यांना नगरभवनच्या हॉलची आवश्यकता भासते. मी मागच्या वेळेला नगरभवनच्या हॉलवर एक पत्र्याची शेड टाका असे बोललो होतो. कारण प्रत्येक जण तो हॉल बुक करताना खालच्या मजल्यावरिल व वरच्या मजल्या वरिलसुद्धा भाडे घेतो. वरचे भाडे दिल्यामुळे आपले उत्पन्न वाढते. परंतु, उत्पन्न वाढीच्या दृष्टीने नगरभवन हॉलला जो काही मंडप करावा लागतो. त्या मंडपाला रु.५ हजार ते रु. १० हजारापर्यंत खर्च करावा लागतो. प्रत्येक वेळेला ते सामान खालून वर चढवायचे असते. प्रत्येक वेळेला सर्व बांबूसकट खाली उतरायचे. त्यामुळे आपल्या पालिकेच्या इमारतीची मोडतोड होते. मी त्याबाबतचा प्रस्ताव टाकलेला होता. तुम्ही त्याबाबतचा निर्णय घ्या. नगरभवनच्या वर जे ओपन टॅरेस आहे. तिथे पत्र्याची शेड करून घ्या. त्यामुळे आपल्या भाडयामध्ये वाढ होईल. आपण त्या ठिकाणी रु. ५००/- भाडे आकारतो. आपल्या वरचे रू. १५००/- ते रु. २०००/- भाडे मिळेल आणि आपले उत्पन्न वाढेल. त्यामुळे तुम्ही याबाबतचा प्रस्ताव घ्या.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी मांडलेल्या सुचनेशी मी सहमत आहे. आताच सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी खारीगाव शाळेचा हॉल भाडयाने देणेबाबत विषय काढलेला होता. परंतु, त्या ठिकाणी एक लहान तलाव आहे. जी लोक हॉल भाडयाने घेतात. ती लोक भोजन कार्यक्रम आटोपल्यानंतर भांडी धुणे किंवा खरकटे वगैरे टाकले तर ते सगळे त्या तलावात जमा होते. त्या तलावाचे रुपांतर एका डबक्यात होते आणि तेथे मासे मरतात. पाण्यातील मासे मेल्यानंतर दुर्गंधी पसरते. जर तुम्ही हॉल भाडयाने देत असाल तर तिथे जेवणाचे प्रयोजन करू नका. कारण मी पत्रव्यवहार केलेला होता आणि मला प्रभाग कार्यालयामधून पत्र देखील दिलेले होते. त्या पत्रामध्ये याच्यानंतर भोजनाचा कार्यक्रम असेल तर आम्ही मान्यता देणार नाही असे नमुद केलेले होते. तरीही मान्यता मिळते. सर्व खरकटे आणि उष्टे पाणी तलावात जाऊन त्या ठिकाणी दुर्गंधी पसरते. तुम्ही त्या लोकांना फक्त भाडयाने हॉल घ्या. परंतु, त्या हॉलमध्ये नास्ता, जेवण वगैरे करायला देऊ नका. जर जेवण करायचे असेल तर त्यांना बाहेरून जेवण करुन यायला सांगा किंवा बाहेर जेवू द्या. त्या हॉलमध्ये भांडी धुणे किंवा भांडी घासणे असा प्रकार घडणार नाही याची दक्षता पाळावी.

**रोहिदास पाटील :-**

या ठिकाणी स्थायी समितीची सभा घेताना दोन-तीन गोष्टींवर चर्चा होणे आवश्यक आहे. या शहरात जे साथीचे रोग आहेत. त्यावर डॉक्टरांनी काहीतरी निवेदन करावे. कारण आता सण चालू आहेत. शहरामध्ये जे काही रोग पसरलेले आहेत. तुम्हाला त्याबाबत काय माहिती मिळालेली आहे? ते सांगा.

**डॉ. पडवळ :-**

उत्तन क्षेत्रामध्ये साथीचे रुग्ण वाढलेले आहेत. डेंग्यू सदृश्य तापाची साथ आहे. आता सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी मा. आयुक्त साहेबांच्या नावाने परवा निवेदन दिलेले होते. आम्हाला त्याच्यापूर्वी काही केसेस हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असल्याची माहिती मिळालेली होती. कारण आमचा हॉस्पिटलशी डेली कॉन्टॅक्ट आहे. आम्ही त्याच्याकडून ह्या संदर्भातील माहिती डेली घेत असतो. शिवाय, त्यांनी ह्या संदर्भात पाच- सहा पेशन्टची यादी दिलेली आहे. आणि आमच्याकडे ती सर्व नांवे होती.

**रोहिदास पाटील :-**

आमचा प्रश्न फक्त उत्तनपुरता नाही. तुम्ही असेच उत्तर देऊ नका. या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये उत्तन, काशी, चेना असेल त्याच्यामध्ये कोणत्या साथीच्या रोगाची लागण आहे असे तुमच्या निदर्शनास आलेले आहे का?

**डॉ. पडवळ :-**

मी पावसाळा सुरू झाल्यापासूनचा आढावा देतो की मे महिन्यामध्ये मोठा पाऊस पडलेला होता आणि तो पाऊस पडत राहिला. आम्ही त्याच्यानंतर साथीच्या प्रतिबंधक उपाययोजना त्यावेळेपासूनच चालू केलेली होती. लोकांनी काय काळजी घ्यावी? याबाबतची माहिती रिक्षाद्वारे पुरवलेली होती. आम्ही लोकांनाही पॅम्पलेट वगैरे छापून लोकांनी पाण्याबाबत व आजूबाजूच्या स्वच्छतेबाबत काय काळजी घ्यावी याबाबत सुचना दिलेल्या होत्या. पावसाळ्याच्या म्हणजेच आतापर्यंतच्या पिरियडमध्ये नवघर रोडला थोड्याशा जास्त प्रमाणात संशयित डेंगूच्या केसेस आढळलेल्या होत्या. विशेषतः साईबाबा नगर आर.एन.पी. पार्क व शिर्डी नगर या ठिकाणी अशा केसेस आढळून आलेल्या होत्या. आम्ही त्यानंतर औषध फवारणी, धुर फवारणी आणि वेळोवेळी केस मिळाल्यानंतर स्वच्छतेची मोहिम राबवलेली आहे. आमच्याकडे डेंग्यू आणि संशयित लेप्टोच्या वीस रुग्णांची जी यादी आहे. आम्ही प्रत्येक केसची माहिती मिळाल्याबरोबर दोनशे घरांचा सर्व्हे करून आजूबाजूच्या कोणी संशयित तापाचे पेशन्ट आहे का? ते बघितलेले आहे जर असे पेशन्ट असतील तर आम्ही त्यांना औषधोपचार केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यामध्ये या संशयित साथीमुळे एवढे एवढे रुग्ण मृत्यूमुखी पडलेले आहेत अशी नोंद तुमच्याकडे आहे का?

**डॉ. पडवळ :-**

आमच्याकडे मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांची नोंद आहे.

**रोहिदास पाटील :-**

या तीन महिन्यामध्ये डेंग्यूमुळे एक पेशन्ट मृत्यूमुखी पडलेला आहे. लेप्टोस्पायरसीसमुळे तीन पेशन्ट मृत्यूमुखी पडलेले आहेत. तसेच, अजून जे काही वेगवेगळा ताप असलेले पेशन्ट असतील तर त्याचे निवेदन करा आणि नंतर तुम्ही त्याच्यावर काय कार्यवाही केली? हे निवेदन करा.

**डॉ. पडवळ :-**

आमच्याकडे आतापर्यंत संशयित डेंग्यूच्या दोन पेशन्टचा डेथ रेकॉर्ड केलेले आहेत. याचा अर्थ आपल्याकडे लेप्टोस्पायरसीसचे पेशन्ट रेकॉर्ड केलेले नाहीत. याचा अर्थ आपल्याकडे लेप्टोस्पायरसीसचे डेथ रेकॉर्ड नाहीत. मी संशयित डेंग्यूबाबत बोलतो. कारण आपण डेंग्यूच्या पेशन्टची तपासणी ॲन्टी बॉडी म्हणजे इनडायरेक्ट केस असते म्हणजे ह्या ह्या केसमध्ये त्या रुग्णाच्या तापाची लेव्हल वाढलेली आहे. याचा अर्थ त्या पेशन्टला डेंग्यू असू शकेल. ही कन्फर्मेटिव्ह टेस्ट नाही. कन्फर्मेटिव्ह टेस्ट फक्त पुण्याला राष्ट्रिय विज्ञान

प्रयोगशाळेमध्ये त्याची तपासणी करुन डेंग्यूचे विषाणू बघूनच त्या पेशन्टला डेंग्यू आहे की नाही ते सांगता येते. त्यामुळे आपण डेंग्यू सदृश्य किंवा डेंग्यू संशयित पेशन्ट असे म्हणतो. आपल्याकडे आतापर्यंत तसे दोन रुग्ण आढळलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ती केस पाठवली का? तुमची ही पळवाट आहे. म्हणून तुम्ही या सभेमध्ये विषय आणलेला नाही. एकतर तुम्ही तो पेशन्ट डेंग्यूचा आहे असे सांगत नाही. दुसरे म्हणजे तुम्ही त्या पेशन्टवर काय उपाययोजना केलेल्या आहेत? ते सांगत नाही. तुम्ही काय करता? ते नेमके तुम्हाला माहिती नाही. डेंग्यूसदृश्य म्हणजे काय? तुम्ही किती रुग्णांचे डॉक्टर म्हणून रक्त चेक करण्यासाठी पुण्याला महापालिकेच्या वतीने नेले ते सांगा. तुम्ही एकाही रुग्णाला रक्त चेक करण्यासाठी पाठवले नसेल कारण आपल्याकडे आता डेंग्यूची साथ नाही.

**डॉ. पडवळ :-**

आम्ही राष्ट्रिय विज्ञान प्रयोग शाळेत रुग्णांच्या रक्ताची तपासणी करण्यासाठी दहा नमुने पाठवलेले होते. आपल्याकडे त्याचा रिपोर्ट मागच्या दोन आठवड्यापूर्वी आलेला आहे. त्याच्यामधील तीन जणांना चिकनगुनिया झालेला होता. ह्याच्यामध्ये जास्तीत जास्त पेशन्ट मराठवाडयातील अफेक्टेड जिल्हयातून आपल्या घोडबंदर परिसरात राहण्यासाठी आलेले होते. चिकनगुनियाच्या दहा पेशन्टपैकी पाच - सात पेशन्ट निगेटिव्ह होते आणि तीन पेशन्ट चिकनगुनियाच्या चाचणीसाठी पॉझीटीव्ह आलेले होते. त्या पेशन्टना थोडीशी पायावर फिलिंग आहे आणि जॉईन्ट आहे. ते पेशन्ट पुढच्या सहा महिन्यापर्यंत राहू शकतात त्यांना फक्त एवढा त्रास आहे. आपल्या मिरा भाईंदरच्या कार्यक्षेत्रामध्ये चिकनगुनियाचा जास्त फैलाव झालेला नाही. आपण ज्या-ज्या भागात माहिती मिळाल्यानंतर प्रतिबंधक उपाययोजना केलेल्या होत्या.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये चिकनगुनिया सुरू झाल्याची सुचना मांडलेली होती. चिकनगुनियाचा एक पेशन्ट कस्तुरी मध्ये आहे. याची तुम्हाला जाणीव आहे का?

**डॉ. पडवळ :-**

मला त्याची जाणीव नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला त्याची जाणीव असायला पाहिजे. तुम्ही सकाळी उठल्यावर आपल्या महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये आणि खाजगी रुग्णालयामध्ये मिरा भाईंदरचे कोणकोणते पेशन्ट दाखल होतात? तुमच्याकडे याचे रिपोर्ट असायला पाहिजे. त्याच्यावर महापालिका कोणकोणती औषध उपाययोजना करते? हे नक्की जाहिर व्हायला पाहिजे. तुम्हाला ते माहिती पडले. परंतु, तुम्ही आम्हाला काहीही सांगितलेले नाही.

**डॉ. पडवळ :-**

आपल्या कर्मचारी चिकनगुनियाचे रुग्ण बाहेरुन आलेले आहेत. त्या रुग्णांना आपल्या हद्दीत येऊन चिकनगुनिया झालेला नाही.

**रोहिदास पाटील :-**

जर ते पेशन्ट आपल्या क्षेत्रात आले तर आपल्या क्षेत्रातील लोकांनासुद्धा चिकनगुनिया होऊ शकतो ना.

**डॉ. पडवळ :-**

आपल्या क्षेत्रातील लोकांनासुद्धा चिकनगुनिया होऊ शकतो. म्हणून आपण त्यावेळेला खबरदारी घेऊ माहिती मिळाल्याबरोबर शासनाने ज्या काही चिकनगुनिया प्रतिबंधक उपाययोजनाबाबत जे परिपत्रक पाठवलेले आहे. आपण त्या अनुषंगाने उपाययोजना केलेल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही तशी प्रेस नोट दिलेली आहे का?

**डॉ. पडवळ :-**

आम्ही प्रेस नोट दिलेली नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जो खर्च केलेला आहे आणि ज्या काही उपाययोजना केलेल्या आहेत तुम्हाला तेवढेच माहिती आहे. तुम्हाला काही माहिती नाही आणि आम्हाला सुद्धा काही गोष्टी माहिती नाहीत. मी सभागृहाला अशी माहिती देतो की आपल्या शहरात ही मोठी साथ फैलावात आहे. परवाच्या दिवशी डेंग्यूचे आठ पेशन्ट उत्तनमधील पोसा हॉस्पिटलतर्फे ट्रान्सफर केल्याचे लेखी निवेदन दिलेले आहे. तुम्ही त्याची माहिती द्या.

**डॉ. पडवळ :-**

आम्ही माहिती देतो.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही मा. आयुक्त व मा. सचिवां तुम्हाला जबाबदार धरतो असे आमचे म्हणणे नाही. जर अशी परिस्थिती असेल तर महापालिका युध्दपातळीवर काय काय करते? तुम्ही औषध फवारणीकरिता खरोखर

माणसे पाठवलेली आहेत का? किंवा कोणाची मदत घेतलेली आहे का? बाहेरचे कोणी डॉक्टर बोलावलेले आहेत का? या ठिकाणी जे पेशन्ट दगावलेले आहेत. आपण त्याच्यावर काय उपाययोजना करणार आहोत? ते सांगा. एवढयासाठी हा विषय आणलेला आहे. तुम्ही या विषयामध्ये काही कसूर केलेली आहे किंवा तुम्ही या विषयामध्ये काहीतरी चालढकल करता असे आम्हाला सिध्द करायचे नाही. परंतु, तुमच्या कार्यपध्दतीचा हा प्रकार असला पाहिजे. जर ते निदर्शनास आले तर तुम्ही मा. आयुक्तसाहेबांना, संबंधितांना, मा. सभापतींना व मा. महापौरांना त्याची माहिती दयायला पाहिजे. जर बिकट प्रसंग असेल तर माईक वरुन सांगायला पाहिजे. शहरामध्ये असे-असे होत आहे असे कळवायला पाहिजे. आम्ही एक करु. तुम्हीसुद्धा एक करा. जर अन्य कोण असेल तर तुम्हाला त्यांचीसुद्धा मदत घेता येईल. जर तुम्ही असेच दाबून ठेवाल तर काहीही होणार नाही. तो वॉर्ड साफसफाईचा दृष्टीने कठिण आहे. तुम्ही त्या वॉर्डमध्ये गेलात, औषध फवारणी केली आणि जंतू मेले असे होणार नाही. तुम्हाला त्याबाबत दक्षता पाळावी लागेल. जर तुमच्याकडे त्यासाठी आवश्यक ती बजेट प्रोव्हिजन नसेल तर तुम्ही बजेट प्रोव्हिजन मागवून घ्या. तुम्हाला बजेट प्रोव्हिजन मागवून घ्यायला कोणी नाही बोलणार नाही. तुमच्या विषयाशी संबंधित आरोग्य खात्याचा विषय आहे. तुम्ही आपल्या क्षेत्रातील सगळ्या हायवेच्या ठिकाणी गेलात तर तुम्हाला असे आढळून येईल की काशिमिरा नाक्यापासून वर्सोवा ब्रीजपर्यंत जाऊ शकत नाही. आपल्याकडे ए.सी.ची गाडी असली तरी सुद्धा आपण जाऊ शकत नाही. मग त्याला कोण जबाबदार आहे? ते सांगा.

**रतन पाटील :-**

हायवेला कचरा टाकायला सुरूवात केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही याचे निवेदन करा. त्यांनी कचरा टाकला किंवा कचरा उचलला किंवा कोणी कचरा टाकला? कचरा टाकतेवेळी जे आरोग्याचे अधिकारी असतील त्यांनी आपल्याकडून परवानगी न घेता संबंधितांकडून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी परवानगी घ्यायला पाहिजे. त्याची माणसे तिचं असणार आहेत. जे.सी.बी. तोच असणार आहे. कचरा हटविण्यासाठी माणूस नाही. जर माती टाकायची असेल तर त्याने माती टाकण्याची परवानगीसुद्धा घेतलेली नाही. आरोग्यवाल्यांनी नाईलाजाने तिथे कचरा टाकला असेल तर आम्ही त्यासाठी तुम्हाला दोषी ठरवत नाही. परंतु, हा कचरा कुठे टाकायचा? असा प्रश्न आम्हालासुद्धा पडलेला आहे. तो कचरा कुठे टाकायचा? याची दक्षता घ्यायला पाहिजे. डॉक्टरांनी याबाबत त्यांना सल्ला दयायला पाहिजे. त्याच्यामुळे कुठले जंतू पसरतात व कुठले रोग होतात. ते तुम्हाला माहिती आहे. त्या लोकांना माहिती नाही. तुम्ही डॉक्टर या नात्याने हा कचरा टाकला तर अशी औषध फवारणी होणे आवश्यक आहे असे तुम्ही त्यांना सांगायला पाहिजे. ती लोक कचरा टाकून मोकळे होतात आणि तुम्ही इंजेक्शन घेउन तयार आहेत असे झाले आहे.

**जयंत पाटील :-**

शहरामध्ये जे खाजगी दवाखाने आहेत. त्यांचा कसा भले होईल हे पाहण्यासाठी या ठिकाणी हा प्रयोग चालू आहे असे मला वाटते दवाखाने जोरात चालावेत.

**रोहिदास पाटील :-**

कोणत्याही दवाखान्यात गेले तर पेशन्टची लाईन लागलेली दिसून येईल.

**हंसूकुमार पांडे :-**

गये महिनेमे अश्विनी हॉस्पिटल मे डेंग्यूके आठ पेशन्ट पडे हूये थे। मैंने उस टाईमपर वहाँ व्हिजीट किया था और उसके बाद श्री. राजकुमार कांबळे साहबको फोन किया था। आप इसकी पहलेसेही प्रिकॉशन क्यों नही लेते है? ऐसे मैंने उनको दम दिया था। जब बारिश शुरू होती है उसके पहले प्रिकॉशन लेना जरुरी है। यह हर सालमे होता है। हमारे प्रभागमे साईबाबा नगरमे एक लडका मर गया है। वह लडका १८-१९ सालका था। आश्विनी हॉस्पिटलने यह लडका डेंग्यूके लास्ट स्टेजमे है उसके लिये उस लडकेको बॉम्बेमे भेज दिया। सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी सही बात बोल रहे है। जैसी उत्तनके हॉस्पिटलकी पोझिशन थी वैसेही अश्विनी हॉस्पिटल का पोझिशन था । उसके बाद दुसरे दिन औषध फवारणी करने के लिये घरघर मे भेजा था। दुसरी बात यह है की औषध फवारणीका दर महिनेमे कितने रुपयोंका टेन्डर रहता है? उसकी जानकारी दिजिये।

**रोहिदास पाटील :-**

औषध फवारणी करुन मच्छर मरत नाही. आपण कोणाला दोष दयायचा नाही. परंतु, जी वस्तुस्थिती आहे ती स्पष्ट करा. आपली महापालिका यासाठी पैसा खर्च करते म्हणून आम्हाला असे सांगावे लागत आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

औषध फवारणीचे महिन्याचे एकूण किती लाख रुपयाचे टेन्डर आहे?

**डॉ. पडवळ :-**

औषध फवारणीच्या टेन्डरची माहिती देण्यासाठी श्री. राजकुमार कांबळे साहेबांना बोलावलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपण श्री. तरवार यांना हे कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मच्छर फवारणी करनेसे मच्छर नही मरती है। इसके लिए कोई अच्छी कंपनीसे दवाई लानी चाहिए। इसके बारेमें महासभामें चर्चा हुई थी। मच्छर फवारणी की दवाई मारनेवाले लोग हफ्तेमें एक बार आते है। इसके लिए हफ्तेमें एक बार इतना बडा प्रभाग पुरा नही होता है। हमारे प्रभागके यादीमें ४४,८७० लोग है। हफ्तेमें एक या दो बार औषध फवारणी करने के लिए आनेसे हमारे पुरे प्रभागमें औषध फवारणी बारबार नही होती है। वह सिर्फ पाच-छः लिटर मच्छर की दवाई लेकर आता है। इसलिए मै आपको टेंडर के बारेमें पुछ रहा हूँ।

**जयंत पाटील :-**

कभी - कभी हमारी निविदामें गलती होती है। हम लोग हर चीजमें लोवेस्ट निविदा पकडते है। इससे हमारे प्रोडक्टकी क्वालिटी अच्छी नही रहती है। एखाद्या चांगल्या कंपनीचे औषध असेल आणि त्या औषधाचा रेट जास्त तरी आम्ही लोवेस्ट प्राईज असलेले रेट पकडतो. मा. सभापतीसाहेब, जर एखादी कुठे काप-यामध्ये फॅक्टरी असेल तर आपण त्या फॅक्टरीबाबत लोवेस्ट रेट पकडता कामा नये.

**हंसुकुमार पांडे :-**

इनका लोवेस्ट रेट बोलेंगे तो भी वह हायेस्ट कंपनीका रेटरहता है।

**जयंत पाटील :-**

ते बरोबर आहे. माझ्या डॉक्टरसाहेबांना असा प्रश्न आहे की आपले जे आरोग्य केंद्र आहे. त्या आरोग्य केंद्रामध्ये डेंग्यु आणि चिकनगुनियाचे पेशंट येतात. आपल्याकडे अशा पेशंटना औषधपाणी करण्याची उपाययोजना आहे का?

**डॉ. पडवळ :-**

डेंग्यु आजारासाठी डेंग्युचे औषध दिल्याबरोबर डेंग्यु बरा होईल असे कुठलेही औषध नाही. डेंग्यु हे व्हायरल इनफेक्शन आहे. १०० लोकांना डेंग्यु झाला असेल तर दोन ते तीन लोकांना सिरियस प्रकारचा डेंग्यु म्हणजे ज्याला डेंग्यु हॅमेराजिक म्हणतात त्यामुळे त्या पेशंटच्या जिवाला धोका असतो. बाकीच्या ९५ पेशंटना थोडेसे अंगदुखी किंवा ताप येतो आणि नंतर तो आजार कमी होतो.

**जयंत पाटील :-**

जनरली हे पेशंट खाजगी रुग्णालयात जातात. आपल्याकडे चिकनगुनिया आणि डेंग्यु सदृश्य पेशंट आहेत.

**डॉ. पडवळ :-**

आपल्याकडे असे पेशंट आहेत. आपण त्या पेशंटना फक्त सिन्टेमॅटीक उपचार देतो. ताप असेल तर ताप कमी करण्याचे औषध देतो. अंगदुखी असेल तर त्याच्यासाठी ॲनालजिसिस औषध देतो. चिकनगुनियासाठीसुद्धा ॲनालजिसिस औषध द्यायची आहेत. बाकी स्टरॉईड किंवा सलाईनची आवश्यकता नसते. आपल्याकडे ती औषधे आहेत.

**हंसुकुमार पांडे :-**

औषधे फवारणीचे टेंडर किती लाखाचे असते ते समजले का?

**डॉ. पडवळ :-**

आपण औषध फवारणीचे टेंडर महिन्याचे १९ लाख रुपयाला देतो.

**हंसुकुमार पांडे :-**

आपले १९ लाख रुपयाचे टेंडर असुनसुद्धा मच्छर मरत नाही. हम लोग नगरसेवक है। इसके हम लोगोने टेंडर के पिछे पडना जरुरी है क्या? यह महानगरपालिकाभी काम है।

**डॉ. पडवळ :-**

आपण त्यांना त्याप्रमाणे सांगितलेले आहे. आणि त्यांनी आपल्याला प्लॅन बनवून दिलेला आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, तुम्ही सांगता त्याप्रमाणे ती लोक काम करत नाहीत. मग आम्ही काय करायचे? तुमचा प्लॅन फक्त कागदावर राहतो.

**डॉ. पडवळ :-**

त्यांनी त्या ठिकाणी ट्रेन केल्यानंतर त्यांनी आपल्याकडे सह्या देउन रिपोर्ट सादर करावा असे आम्ही सांगितलेले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

अधिकारी लोग कॉन्ट्रॅक्टरसे डरते क्यो है? यह मुझे समझमें नही आता है।

**रोहीदास पाटील :-**

तुम्ही विचार करा की आपण आपल्या बजेटमधून १९ लाख रुपये एका महिन्यामध्ये औषध फवारणी करण्यासाठी देतो. परंतु, त्याचा काय रिझल्ट मिळतो? ते तरी समजायला पाहिजे. तुम्ही सांगाल आम्ही समाधानी आहोत तर तुम्ही १९ लाख रुपयाऐवजी २१ लाख रुपये घ्या. आम्ही नाही म्हणणार नाही. जर १९ लाख रुपये देउन त्याचा नउचाही उपयोग नसेल तर त्याला काय अर्थ आहे? लोक त्रस्त आहेत. साथ वाढत

आहे. तुम्ही उपाययोजना करताना कुठेही दिसत नाही. खरोखर ही लोक आलेली आसतील तर तुमचे आरोग्य खाते आणि हॉस्पिटलची जी लोक आहेत ती लोक रात्रंदिवस काम करित असल्याचे चित्र दिसत नाही. जेणेकरुन लोकांना विश्वास वाढला असता.

**हंसुकुमार पांडे :-**

यह औषध फवारणी का काम बारीश शुरु हुआ तब शुरु होना जरुरी है यह आप ध्यान मे रखो जो आप लोग करते है उसका भोग हमे देना पडता है और हम लोग बदनाम होते है। नगरसेवक कुछ नही करते है, नगरसेवक कुछ नही बोलते है। नगरसेवक आप लोगोंको बोलते है। वह पब्लिक को दिखता नही है। इसलिए पब्लिक हमारे उपर एलिगेशन लगाती है।

**मा. सभापती सो. :-**

डॉक्टर साहेब, तुम्ही साहेबांना भेटण्याची तसदी घेतली का? तुम्ही त्यांना भेटले का?

**डॉ. पडवळ :-**

मी त्यांना नेहमी भेटतो. आडवड्यातुन दोन वेळा भेट होते.

**जेन्वी अल्मेडा :-**

तुम्ही त्यांना रजिस्टर मेन्टेन केले असल्याची खात्री करुन घेतलेली आहे का?

**डॉ. पडवळ :-**

प्रत्येक प्रभागाचे रजिस्टर मेन्टेन केलेले आहे. त्या रजिस्टरवर नगरसेवकांच्या सह्या आहेत.

**जेन्वी अल्मेडा :-**

तिथे औषधे उपलब्ध नाहीत. नगरसेवकांनी फक्त सह्या केलेल्या आहेत. आम्ही आमच्या प्रभागात बघितलेले नाही. शिवाय, सहा दिवसातुन एक वेळा कचऱ्याची गाडी पाठवतात.

**डॉ. पडवळ :-**

मी प्रत्येक नगरसेवकाला प्रत्यक्ष नेउन दाखवतो.

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब आमची साईन करण्याबाबत काहीही हरकत नाही.

**डॉ. पडवळ :-**

एरियामध्ये जी काही कामे केलेली आहेत. मी त्याबाबत प्रत्यक्ष दाखवतो.

**जेन्वी अल्मेडा :-**

आम्हाला ते प्रत्यक्ष दाखवा. शिवाय, मी आता तुमच्याशी आकाशगंगाकडील देवचंद्र रोडवरुन कचऱ्याची गाडी आतमध्ये का जात नाही?

**राजकुमार कांबळे :-**

एक तारखेपासून दोन दिवस बंद होते.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही बोलता दोन-तीन दिवस बंद होते. परंतु, आपण वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. जर त्या कॉन्ट्रॅक्टरने हा कचरा उचलली नाही तर आपण त्या कॉन्ट्रॅक्टरचे पैसे टेन्डरमधून वजा करुन टाकू.

**राजकुमार कांबळे :-**

त्या कॉन्ट्रॅक्टरने ज्या दिवशी कचरा उचलला नसेल तर आपण त्या दिवसाचे पैसे त्याच्या टेन्डरमधून वजा करतो.

**जयंत पाटील :-**

त्या कॉन्ट्रॅक्टरने असे किती दिवस कचरा उचलला नव्हता? तुम्ही त्याचा अहवाल आम्हाला द्या.

**राजकुमार कांबळे :-**

आम्ही त्याचा अहवाल देउ.

**रोहिदास पाटील :-**

हायवेवर जो कचरा पडलेला आहे आणि त्या ठिकाणी जी काही दुर्गंधी पसरलेली आहे. त्याच्यावर काय उपाययोजना केली?

**राजकुमार कांबळे :-**

परवाच्या दिवशी काजूपाड्याला गाड्या बंद केल्या आणि गाड्या गेल्या होत्या आणि इथून कचरा पण उचलायचा होता त्यावेळेला तो कचरा कोणी टाकला? ते माहित नाही. परंतु, आपल्याच लोकांनी कचरा टाकलेला होता. मी आता त्याबाबत इन्स्ट्रक्शन दिलेले आहे.

**मा. सभापती सो. :-**

हायवेसमोर एवढा खड्डा पडलेला आहे. त्याच्यामध्ये कचरा टाका.

**राजकुमार कांबळे :-**

मी तो कचरा उचलायला सांगतो.

**हंसुकुमार पांडे :-**

श्री. राजकुमार कांबळे साहब, रोडपर जो लोग कचरा डालते है। उनके उपर फाईन करेंगे ऐसी पब्लिकके लिए कुछ नोटीस निकालो और लोगोमें ऐसी कुछ घबराट बिठाओ। हम लोग बोल-बोलकर परेशान होते है। हम लोग और आप लोग पुरा दिन नही रह सकते है। कही भी गल्लीमे एक बार जगहपर इतना गंदा करके जाते है। एक जगहपर किसीने थोडासा कचरा डाला तो उसके उपर और कचरा जमा होता है।

**जेन्वी अल्मेडा :-**

असा कचरा टाकणाऱ्यावर व थुंकणाऱ्यावर दंड करा.

**राजकुमार कांबळे :-**

मागच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये थुंकणे व कचरा टाकणे यांच्यावर फाईन करण्याचा विषय आणलेला होता. परंतु, हा विषय फेटाळलेला होता. तुमची इच्छा असेल तर आम्ही हा विषय पुन्हा आणतो.

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही थुंकणे किंवा कचरा टाकणाऱ्यावर फाईन करा. जर तुम्ही एक-दोन जणांना फाईन करायला सुरुवात केली तर कोणीही रस्त्यावर कचरा टाकणार नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्ही हा विषय स्थायी समितीकडे कधी आणला होता?

**राजकुमार कांबळे :-**

हा विषय स्थायी समितीकडे एक वर्षापुर्वी आणलेला होता. तेंव्हा सभापती श्री. मोहन पाटील होते.

**मा. सभापती सो. :-**

हा विषय, माझ्या कारकिर्दीमध्ये स्थायी समितीला आलेला नव्हता.

**जेन्वी अल्मेडा :-**

तुम्ही हा विषय विषयपटलावर आणा.

**मा. सभापती सो. :-**

तुम्ही हा विषय पुन्हा स्थायी समितीमध्ये आणा. गटारावर ज्या पानाची गाद्या काढण्याबाबत सांगितलेले होते.

**जयंत पाटील :-**

हा विषय पुन्हा आणून काहीही उपयोग होणार नाही. कारण अधिकारी आणि त्यांचे कर्मचारी तिथे कमाई करायला लागतील. अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांनी रस्त्यावरिल गाड्या उचलण्याऐवजी हप्ते घ्यायला सुरुवात केलेली आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

हे सुद्धा बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

हे फॅक्ट आहे. त्याच्यामध्ये रु. १००/- दंड असेल तर ५० रुपये मला द्या असे चालले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

परंतु, ५० रुपये दंड त्यांच्या खिशातून गेला तर थूकताना तो लक्ष ठेवणार.

**जेन्वी अल्मेडा :-**

मुंबई महानगरपालिकेने दंड लावलेला आहे.

**जयंत पाटील :-**

हा दंड महापालिकेला मिळायला पाहिजे.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण तशी व्यवस्था कॉर्पोरेशनमार्फत करु शकतो.

**रोहिदास पाटील :-**

श्री. पाटीलसाहेब, आपली आजची ही चौथी बैठक आहे. या बैठकीला अतिक्रमणाचा एकही अधिकारी उपस्थित नाही आणि हे सर्व तुम्ही स्वतःच्या अंगावर घेत आहात. शिवाय, तुम्ही काय करत नाही? तुमचा उद्देश असा आहे का? की जोपर्यंत आम्ही या सभागृहात आहोत तोपर्यंत अतिक्रमणचा प्रतिनिधी सभागृहात येणार नाही. मग आम्ही तुंम्हाला प्रश्न विचारु.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो) :-**

मा. सभापतींच्या माध्यमातुन सभागृहाला माहिती देवु इच्छितो की मा. आयुक्तसाहेबांनी संपुर्ण प्रशासनाला विषयपटलावर विषय असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांनी सभेला हजर रहावे असे निर्देश दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

अतिक्रमण विभागाचा विषय पेंडिंगच राहिलेला आहे. हा विषय चार सभांपासून अतिक्रमणचा विषय विषयपटलावर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो) :-**

अतिक्रमणचा विषय मा. आयुक्तसाहेबांनी स्वतःच्या नियंत्रणाखाली चालवलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मग या विषयावर चर्चा करण्यासाठी मा. आयुक्तसाहेबांना बोलवा. जर अतिक्रमणाचा विषय मा. आयुक्तसाहेब सांभाळणार असतील तर आम्ही मा. आयुक्तसाहेबांना बोलावण्याचा आग्रह धरतो. ही सभा इथेच थांबवा आणि मा. आयुक्तसाहेबांना बोलवा आपण नंतर विषय चालू करुया. अनेक प्रश्न असताना तुम्ही एक अधिकाऱ्याला का सांभाळता? तुम्ही अधिकाऱ्यांना सांभाळता असे आम्ही बोलत नाही. परंतु, अधिकारी ठामपणे निर्णय घेत नाहीत म्हणून आंम्हाला असे बोलावे लागते.

**एस. ए. खान :-**

अतिक्रमणाचे अधिकारी जायचे तिथे जात नाही आणि नको तिथे जातात.

**मा. सभापती सो. :-**

परंतु, आता अतिक्रमणच्या विषय नाही.

**एस. ए. खान :-**

आता विषय नाही हे आंम्हालासुद्धा माहिती आहे. मग नेहमी - नेहमी मिटींगला अधिकारी का येत नाहीत? तुम्ही त्यांच्यावर कारवाई करित नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

हे अतिक्रमणचे अधिकारी कशाला ठेवलेले आहेत? परंतु, तुम्ही मला आता सांगितल्यावर मी तुंम्हाला अशी माहिती देतो की गणपती विसर्जनाची आत्ताला पाचव्या दिवसालाही व्यवस्था झालेली नाही. उत्तर द्या आंम्हाला. आम्ही तिसऱ्या कोणाची अपेक्षा करणार नाही. जर याचे निवेदन मा. आयुक्तसाहेब स्पष्ट करत असतील तर तुम्ही मा. आयुक्तसाहेबांना याठिकाणी बोलवा. ही काही चावडी नाही. आम्ही येणार - जाणार अस होणार नाही. आता जसा आरोग्याचा विषय. आम्ही या विषयाबाबत श्री. राजकुमार कांबळे साहेबांना काहीही वेगळे बोललेलो नाही. आम्ही त्यांना विनंतीच केलेली आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

डेढ दिनके गणपतीमें साईडमें रोडपर बहुत बडी गाडीयाँ खडी रहती है। ॲक्चुली गणपती विसर्जनके टाईमपर गाडीयोंको हटाना चाहिये। आप लोगोंने वह इन्स्ट्रक्शन मेसेज देना चाहिए हम लोग हर एक बिल्डिंगवालोंकी नही दे सकते है। रोडके बीचमें गाडी खडी रहनेसे गणपती विसर्जन के समयमें बहुत ट्रॅफिक हो जाता है। श्यामको भाजीवालोंकी गाडी रहती है। ग्याराह दिनके गणपतीका विसर्जन होता है तब भाजीवालोंकी गाडीयाँ बंद करते है। बाकी डेढ दिन या पाँच दिनके गणपती विसर्जन के समयपर इन गाडीयोंकी फिकिर नही करते है। जहाँपर सार्वजनिक गणपती रहते है। लोग उसके बॉर्डरके उपरकी जगहपर हातगाडी वगैरा रहेगी तो अलग बात है। वह लोग वह लाईन छोडकर गाडी रोडके उपर लेके जाते है। फिर वह ट्रॅफिक कहाँसे जायेगी। अभी महानगरपालिकाके परिवहन समिती के तरफसे बस चालू हो गई है। इतनी ट्रॅफिक हो गई है। इतनी बडी -बडी गाडीयाँ हो गई है। तो फिर गाडी कहाँ से जाएगी? लेफ्टसे क्रॉस करने के लिए एक गाडी आती है। तब गोडदेव नाकेपर पुरा ट्रॅफिक जमा होता है। केबिन रोड, बी. पी. रोड और नवघर रोडपर जल्द ही ट्रॅफिक जॅम होता है। बाकी सब जगहपर बडे - बडे रोड है। आपको उसके उपर कुछ ॲक्शन होना आवश्यक है।

**रतन पाटील :-**

ज्या रोडवर जास्त प्रमाणात फेरिवाले वगैरे बसतात त्याठिकाणी अतिक्रमणाची मोहिम रोजच चालू ठेवा. आंम्हाला रहदारीसाठी फार त्रास होतो.

**हंसुकुमार पांडे :-**

सकाळपासून संध्याकाळपर्यंत गाड्यापार्किंग होत असतात.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही महापालिकेचे अस्तित्व दाखवायला तयार नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

हम लोगोंके गणपती विसर्जनके टाईम जैसल पार्क एरियामें जाते है। जैसल पार्क एरियामे दोनो तरफसे गाडी पार्किंग के लिए रहती है। एक दिन के लिए उन गाडीयों को हटाना चाहिए।

**रतन पाटील :-**

गणपती विसर्जनाच्या दिवशी दररोज गणपती जाणार असल्यामुळे तुम्ही रस्त्यावरुन गाड्या हटवा.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही तशा सुचना करायला पहिजेत. ते ऐकायलासुद्धा तयार नाहीत.

**हंसुकुमार पांडे :-**

ॲक्च्युली हमारा रोड ब्रॉड है। लेकिन गाडीके वजहसे ट्रॅफिक जाम हो जाता है। आप उसका जरा खयाल रखिए।

**रतन पाटील :-**

तुम्ही हे काम युद्धपातळीवर घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

गणपती येणाऱ्या पाचव्या दिवशी आणि अनंत चतुर्थीच्या दिवशी हटविले जाण्याची नोंद घेतली जाईल.

**रतन पाटील :-**

आज गणपतीचा पाचवा दिवस आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण संबंधितांना सुचना देवुन फेरिवाले हटविण्याचे काम युद्धपातळीवर करुया आणि ज्या सुचना दिलेल्या होत्या त्याची नोंद घेण्यात येईल.

**जयंत पाटील :-**

जैसल पार्कला गणपती विसर्जन होते. परंतु, खरे पाहिले तर तुंम्हाला सगळे रस्ते फेरिवाल्यापासुन मुक्त करावे लागतील. नवघर रोड, बी. पी. रोड आणि केबिन रोडला फेरिवाले भरपुर प्रमाणात बसलेले असतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नवघर रोड, केबिन रोड आणि बी. पी. रोड या रस्त्यावरिल अतिक्रमणे आज आणि गणपती विसर्जनाच्या शेवटच्या दिवशी हटविले जाईल.

**जयंत पाटील :-**

ते सर्व रस्ते 'ना फेरिवाला क्षेत्र'चे  रस्ते आहेत.

**रतन पाटील :-**

ते सर्व रस्ते 'ना फेरिवाला क्षेत्रचे' रस्ते असल्यामुळे त्या रस्त्यावर फेरिवाल्यांना बसायला देवु नका.

**हंसुकुमार पांडे :-**

जहाँपर 'ना फेरिवाला क्षेत्रचे' बोर्ड लगाये है। उसके नीचे ही फेरिवाला बैठा है। 'ना फेरिवाला झोन' सिर्फ नाम के लिये बनाया है।

**जयंत पाटील :-**

आपल्या बंदरवाडी प्रभाग कार्यालयाच्या बाहेर फेरिवाले बसलेले असतात. तुम्ही त्या फेरिवाल्यांना कधी उचलणार? ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

मी हा विषय शांतता कमिटीच्या मिटींगमध्ये घेतलेला होता.

**मा. सभापती सो. :-**

अतिक्रमण विभागाचे जे कर्मचारी हप्ते वगैरे घेतात. त्या अधिकाऱ्यांची पंधरा-वीस दिवसांनी बदली करा.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, किंवा मा. सभापती साहेब अतिक्रमणचा विषय घेत नाहीत का?

**रतन पाटील :-**

साहेब, अतिक्रमणच्या अधिकाऱ्यांना बोलवा.

**रोहिदास पाटील :-**

साहेबांनी बाहेर गेल्यावर आपली बाजू घेतली पाहिजे असा आमच्या आग्रह राहिल.

**शशिकांत भोईर :-**

मी महासभेमध्ये अतिक्रमणच्या विषयाबाबत खूप वेळा भांडलो होतो आणि ठरावसुदधा केला अतिक्रमण काही हटवत नाहीत आणि रस्त्यावर बाजार बसलेला असतो. बी. पी. रोड एवढा कन्जेस्टेड आहे की माणसाला जायला-यायला भारी पडते. मासळी कापण्याच्या पातरीवर सुद्धा फेरिवाले बसलेले असतात.

**हंसुकुमार पांडे :-**

गोडदेव नाकेवर पॉव रखने के लिये जगह नही है। फेरिवालोंके लिये नगरपालिका कुछ लायसन्स इश्यू होना चाहीये। भाजी मार्केटमे बैठनेवाले जो जुने फेरिवाले है। उनको एक लायसन्स दिजिये। क्योंकी जो नये-नये हॉकर्स बैठते है उनको भी रु. १५/- लेना उचित नही है। वह लोग रु. १५/- देके रोज धंदा करते है। एक टोकरी लगाई रु. १५/- लिये बस हो गया। उससे जनता को कितनी तकलिफ होती है वह देखिये। अपना एस.व्ही.रोड फुट १५ चौडा है। पंधरा फुटमे चार-पाँच फुट चौडी गाडी खडी रहती है। उसमेसे लॉरी नही जा सकती इतना वह रोड कन्जेस्टेड रहता है।

**जयंत पाटील :-**

तुम्ही सांगितलेला पॉईंट बरोबर आहे. शहरामध्ये कोणीही येतो आणि हातगाडी लावतो. तुम्ही त्याच्यासाठी लायसन्स ठेवा. त्याने आपली परमिशन घेतली पाहिजे.

**मा. सभापती सो. :-**

आपण आपल्या हद्दीमध्ये येणाऱ्या फेरिवाल्यांसाठी अशी ॲक्शन घेवुया.

**एस. ए. खान :-**

आपल्या हद्दीमध्ये येणाऱ्या फेरिवाल्यांवर ॲक्शन घ्या.

**जयंत पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, आपल्याला लायसन्सच्या माध्यमातून उत्पन्न मिळेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता याठिकाणी हा विषय चर्चेला आलेला आहे. प्रत्येक शहरामध्ये त्या शहराच्या लोकसंख्येप्रमाणे किती हॉकर्स असावेत? याचे धोरण निश्चित केले जाते. आम्ही पनवेलला काम केलेले होते. तेंव्हा तिथे ७०० च्या वर हातगाड्या राहणार नाहीत असे ठरलेले होते. आपल्याला त्याच्यामध्ये सुधारणा करायची असेल तर जुन्या रद्द करुन नवीन गाड्या दिल्या जातात.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे त्याचा सर्व्हे रिपोर्ट आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परंतु, आपल्या एरियामध्ये लायसन्स दिलेले नाहीत.

**हंसुकुमार पांडे :-**

जैसल पार्कके कॉर्नरमें हॉकर्स सामान लेके बैठे है। उन लोगोंको लायसन्स देकर परमनन्ट किजिए। उन लोगोंके पाससे वर्षिक उत्पन्न लिजिए।

**मा. सभापती सो. :-**

मी मागच्या वेळेला हा विषय काढलेला होता.

**रोहिदास पाटील :-**

जैसल पार्कमधील फेरिवाले हटविण्याबाबत मी पत्र दिलेले होते. तरीसुद्धा जैसल पार्कवरिल फेरिवाले हटविले जात नाहीत.

**हंसुकुमार पांडे :-**

एक आदमी को एक लायसन्स की परमिशन देनी चाहिए। मगर हमारे यहाँपर उक आदमी चार - चार गाडीयाँ लगाकर बैठा है और दुसरे को बैठने नही देता है। ऐसे नही होना चाहिए। साहेब, यापूर्वीच्या सभेमध्ये असा विषय आलेला होता तुम्ही हा विषय पास करुन घ्या.

**जयंत पाटील :-**

साहेब, तुम्ही हा विषय धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी महासभेपुढे पाठवा.

**एस. ए. खान :-**

हॉकर्सना लायसन्स देण्याबाबत ज्या काही अटीशर्ती ठरवायच्या असतील तुम्ही त्या अटीशर्ती ठरवून घ्या. त्याच्यानंतर लायसन्स द्या.

**हंसुकुमार पांडे :-**

यह विषय महासभामें लिजिए।

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही हा विषय महासभेत घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा विषय निर्णयासाठी महासभेतच जाईल.

**रतन पाटील :-**

ह्याच्यामध्ये दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी आहे की हे जे फेरिवाले बसलेले आहेत त्यापैकी एखादा फेरिवाला ही जागा १ लाख ते २ लाख रुपयाला विकतो आणि दुसरीकडे जाउुन बसतो. असा संपूर्ण रोडवर त्या फेरिवाल्याचा धंदा चाललेला आहे.

**एस. ए. खान :-**

म्युनिसिपालिटीचा रोड त्या फेरिवाल्यांचा आहे का?

**रतन पाटील :-**

ते रोड म्युनिसिपालिटीचे असुन सुद्धा त्या रोडला सुविधा मिळणे योग्य नाही.

**मा. सभापती सो. :-**

ज्यांच्याकडे पंधरा वर्षापासुनचे रेशनिंग कार्ड आहे. तुम्ही त्या फेरिवाल्यांना बसायला परवानगी द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शहरामध्ये जे हॉकर्स आहेत. आम्ही त्यांच्याबाबतचे उपविधी तयार केलेले आहेत. आपण त्या अनुषंगाने कार्यवाही करुया.

**जयंत पाटील :-**

शहरामध्ये खाद्यपदार्थांच्या गाड्यासुद्धा कार्यवाही करुया. तुम्ही त्याबद्दल काय कार्यवाही करणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण खाद्यपदार्थांच्या गाड्यांवरसुद्धा कार्यवाही करुया.

**जयंत पाटील :-**

माझ्या प्रभागात ती लोक उघड्यावर खाद्यपदार्थ बनवतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता याठिकाणी अतिक्रमण विभागाचे श्री. संजय तायशेटे आलेले आहेत. आपण आंम्हाला गणपती विसर्जनाच्या कालावधीमध्ये ज्या सुचना दिलेल्या होत्या त्या सुचनांचा विचार करुन गणपती विसर्जन करण्याबाबत गैरसोय होणार नाही किंवा नागरिकांची गैरसोय होणार नाही. तुम्ही त्या अनुषंगाने काय नियोजन केलेले आहे? काय कार्यवाही केलेली आहे? ते सांगा.

**संजय तायशेटे :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की, ज्यावेळेला मा. उपायुक्त मुख्यालय यांनी आमची बैठक घेउुन जे आदेश दिलेले होते ते जरीमरी तलाव व काशी स्मशानभूमीबाबत दिलेले होते. त्याबाबत सन्मा. सदस्य पाटीलसाहेबांनीपत्राने कळविल्याप्रमाणे ते फेरिवाले उचलले होते. विसर्जनाच्या दिवशी मुख्य रस्ता व सब रस्ता क्लिअर करण्याचे ठरवलेले होते. जेणेकरुन, त्या रस्त्यावरुन श्रींची विसर्जन मिरवणूक निघणे सोयिस्कर होईल.

**रतन पाटील :-**

तुम्ही फक्त अनंत चतुर्दशी विसर्जनाबाबत बोलता का?

**संजय तायशेटे :-**

ज्या - ज्या दिवशी विसर्जन होते. मी त्या दिवसाबाबत बोलत आहे.

**रतन पाटील :-**

परंतु, ही रोजची परिस्थिती नाही. तुम्ही ते फेरिवाले उचलले होते का?

**संजय तायशेटे :-**

आम्ही फेरिवाले उचलले होते.

**रतन पाटील :-**

तुम्ही कुठले - कुठले फेरिवाले उचलले होते? ते सांगा. बी. पी. रोडचे फेरिवाले दिड दिवसाच्या गणपती विसर्जना नंतर तसेच बसलेले होते.

**संजय तायशेटे :-**

गौरी - गणपती विसर्जन आणि अनंत चतुर्दशीचे विसर्जना प्रामुख्याने या दोन दिवशी श्रींची मिरवणूक मोठ्या प्रमाणात निघते. त्यादिवशी मुख्य रस्त्यावरिल हातगाड्या ठरविल्या जातात जेणेकरुन, मिरवणूकीत अडथळा येउु नये हा त्यामागचा उद्देश असतो. रस्त्यावर जी वाहने आहेत आणि ज्या रस्त्यावरुन मिरवणूक निघते ती वाहने टोईंग मशिनने जमा करुन घ्यायला सुरुवात केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे टोईंग मशिन आहे का?

**संजय तायशेटे :-**

आपल्याकडे टोईंग मशिन आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे टोईंग मशिन आहे. मग आपला जो एस. टी. स्टँड आहे. त्याठिकाणी असलेल्या जीप वगैरेसारख्या गाड्या का उचलल्या जात नाहीत? जिथे आपल्या बसेस जातात, एस. टी. जातात, एस. टी. येते. तिथे सतत ट्रॅफिक जॅम असते. तुंम्हाला त्याच्यामध्ये कसली कमी आहे? ते सांगा. तुमच्याकडे माणसे कमी आहेत का? तुमच्याकडे गाडी नाही असे काही आहे का? जर तुमच्याकडे टोईंग मशिन असेल तर कार्यवाही व्हायला पाहिजे. तुम्ही टोईंग मशिनचे भाडे देता मग तुम्ही कित गाड्या उचलल्या? ते सांगा.

**जयंत पाटील :-**

श्री. संजय तायशेटे यांनी सांगितले परंतु, आपण नवघर रोड, बी. पी. रोड, रेल्वे पॅरेलल रोडच्या गाड्या उचलायला परवानगी दिलेली नाही का? नवघर रोड, बी. पी. रोड, केबिन रोड येथील गाड्या उचलायच्या नाहीत का? आपण हे रस्ते गणपती विसर्जनासाठी दिलेले आहेत असे सांगितलेले आहे. मग तुमचे मुख्य रस्ते कुठले आहेत?

**हंसुकुमार पांडे :-**

तुमचे मुख्य रस्ते कुठले आहेत?

**संजय तायशेटे :-**

नवघर रोड, बी. पी. रोड हे मुख्य रस्ते आहेत.

**जयंत पाटील :-**

मुळात तुमचे हे 'ना फेरिवाला क्षेत्र' चे रोड आहेत हे तुंम्हाला माहिती असायला पाहिजे. मग तिथे फेरिवाले बसत नाहीत का?

**संजय तायशेटे :-**

तिथे फेरिवाले बसतात.

**जयंत पाटील :-**

'ना फेरिवाला झोन'मध्ये फेरिवाले का बसतात? आपण अतिक्रमण विभाग ठेवलेला आहे. मग फेरिवाले का बसतात?

**रोहिदास पाटील :-**

तुमच्याकडे साधन सामुग्री कमी आहे का? तुम्ही सक्षम नाहीत का? मग तसे असेल तर तूम्ही आमच्याकडे माणसे नाहीत, आंम्हाला वेळ नाही. असे सांगा.

**संजय तायशेटे :-**

मी सन्मा. सदस्यांना विनेती करतो की जर तुंम्हाला असे कुठे आढळले तर कृपा करुन आंम्हाला कळवा.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे स्टाफ कमी आहे का? जर स्टाफ कमी असेल तर तसे सांगा. श्री. तायशेटे, तुमची माणसे तुमचे ऐकत नाही का? मी तुंम्हाला राहुल पार्कबाबत पत्र दिलेले होते. तुंम्हाला राहुल पार्कमध्ये एकही गाडी मिळाली नाही का?

**संजय तायशेटे :-**

आम्ही राहुल पार्कमधील गाड्या उचलल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

राहुल पार्कमधील एकही गाडी उचलली नाही. जर गाडी उचलून नेली असेल तर आंम्हाला फाडलेली पावती दाखवा आणि एवढे - एवढे पैसे जमा झालेले आहेत असे सांगा. जर पैसे जमा केले असतील तर आमच्याकडे त्या चार गाड्या पडलेल्या आहेत.

**हंसुकुमार पांडे :-**

उधर के लोग गाडीवाले लोंगोसे हप्ता लेते है। आपकी यह सब मालुम होगा।

**संजय तायशेटे :-**

नगरपालिकाके लोग हप्ता लेते है क्या?

**हंसुकुमार पांडे :-**

आपको नाम मालुम है। वहाँके लोग हप्ता लेते है। मगर नगरसेवक लोग हप्ता नही लेते है। कुछ पक्ष के लोग हप्ता लेते है। आपको वह सब मालूम है। मगर आप लोग उनको मदद करते है। वह मदद लेते है। आप पब्लिकको भी देखो। पब्लिकको चलने के लिए रस्ता नही है। सन्मा. सदस्य रोहिदास पाटील बोलते है वह बात सही है। मगर वहाँपर चलने के लिए जगह है क्या? वह बताईये। वह मेरा प्रभाग है।

**रोहिदास पाटील :-**

इसमे हम लोगोंको यह दुःख हुआ है की काम करनेवालेको काम करने के लिए नही दिया है। त्या ठेकेदाराला कोणीही मदत करत नाही. काहीही काम करायला देत नाही.

**एस. ए. खान :-**

ठेकेदाराला झाडेसुद्धा लावायला देत नाहीत.

**संजय तायशेटे :-**

आम्ही आज होणारे गणपती विसर्जन आणि येणाऱ्या गणेश विसर्जनाच्या कालावधीमध्ये दक्षता घेण्याची सुरुवात केलेली आहे. त्याप्रमाणे माझे अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

**जयंत पाटील :-**

श्री. तायशेटे साहेब, मी प्रत्येक वेळेला नवघर रोड आणि बी. पी. रोड 'ना फेरिवाला क्षेत्र' आहेत असे मी प्रत्येक वेळेला सांगत आलेला आहे. तुम्ही ते कायमचे बंद का करत नाही?

**शशिकांत भोईर :-**

मी फेरिवाले हटविणेबाबत ठराव केलेला होता. तरीसुद्धा तुम्ही फेरिवाल्यांना हटवत नाही.

**जयंत पाटील :-**

गणेश विसर्जन हा वेगळा भाग आहे.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही पत्र व्यवहार करुन थकलेलो आहोत.

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही हॉकर्सना उचलण्यापूर्वी त्यांना फेरिवाला झोन बनवून द्या.

**मा. सभापती सो :-**

हे एवढे महाग टेंडर असेल तर टेंडर घेणारा माणूस काय करेल? ते सांगा.

**जयंत पाटील :-**

टेंडर घेणाऱ्याने 'ना फेरिवाला क्षेत्र'चा उल्लेख केलेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

'ना फेरिवाला क्षेत्र' वगळून आहे.

**संजय तायशेटे :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटीलसाहेब यांच्या म्हणण्यानुसार गणेशोत्सव संपल्यानंतर कार्यवाही हाती घेण्यात येईल.

**गिता जैन :-**

श्री. तायशेटेसाहेब, तुम्ही भाईंदर (वेस्ट) लासुद्धा कार्यवाही करा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९० चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, प्रकरण क्र. ९० मध्ये दि.२१/८/२००६ रोजीचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे पत्र आहे. त्या पत्रामध्ये दि. २७ फेब्रुवारी २००२ रोजी एकूण दहा जुन्या भाडे करुन अनधिकृतपणे गाळ्यांचा ताबा घेतला असे नमुद केलेले आहे. परंतु, माझ्या माहितीप्रमाणे त्यांना अनधिकृतपणे गाळ्यांचा ताबा न देता नगरविकास विभागातर्फे त्या गाळ्यांचे ड्रॉ काढलेले होते आणि ते ड्रॉ काढून ज्यांच्या - ज्यांच्या नावाने जो - जो गाळा आला त्याला तो गाळा तसा दिलेला होता. परंतु, माझ्या माहितीनुसार 'अनधिकृत' हा चुकीचा शब्दप्रयोग आहे. तुम्ही याची शहानिशा करावी. तत्कालीन नगरपरिषद असतांना नगरपालिकेचे अधिकारी कोण होते? त्यांच्याकडून खुलासा करुन घ्यावा आणि या ठिकाणी अनधिकृत असे चुकीचे दिलेले आहे अशी मी तुंम्हाला सुचना करतो.

**रतन पाटील :-**

साहेब, हा विषय तसा गंभीर आहे. मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या आर्थिकीकरणाच्या दृष्टीने गंभीर विषय आहे. याठिकाणी प्रभाग कार्यालय, इमारतीसमोर भाडेकरुकरिता बांधलेल्या इमारतीमधील गाळे वाटप असे स्पष्टपणे लिहिलेले आहे. हे भाडेकरु आपले होते का? ते स्पष्टपणे लिहिलेले आहे. हे भाडेकरु आपले होते का? ते स्पष्ट करा आपण त्या लोकांना कुठे बसवलेले होते? ते सांगा. आपण त्यांना याठिकाणी भाडेकरु म्हणून संबोधलेले आहे. ते रस्त्यावर बसणारे फेरीवाले होते, टपरीवाले होते ते आपले भाडेकरु कसे झाले? याचा प्रथम खुलासा करा.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे त्यांच्या पावत्या आहेत. आपण त्यांना रितसर दि.१५/५/२००० रोजी पत्र दिलेले होते.

**रतन पाटील :-**

त्यावेळेला त्याठिकाणी महानगरपालिकेने बांधकाम केलेले होते का? तिथे महापालिकेने काही शेड बांधलेली होती का? आपण शेड बांधून त्याचे आयोजन केलेले होते का? ती लोक उघड्यावर बसतात म्हणून आंम्हाला बोलावे लागत आहे.

**दिपक खांबित :-**

पंधरा लोकांना जागा दिलेली होती आणि त्यांनी त्या जागेवर टपऱ्या बांधलेल्या होत्या.

**रतन पाटील :-**

कुठे जागा दिलेली होती?

**दिपक खांबित :-**

आम्ही जुन्या ऑफिससमोर जागा दिलेली होती.

**रतन पाटील :-**

कोणी जागा दिलेली होती?

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे ग्रामपंचायतपासुन म्हणजे सन १९७९ पासुनचे पेपर्स आहेत. तत्कालीन ग्रामपंचायत असतानाची भाडेपावती आहे आणि आपल्या म्युनिसिपाल्टीची पावतीसुद्धा आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी त्यावेळेच्या नियमानुसार भुईभाडे दिलेले होते.

**रतन पाटील :-**

साहेब, तसे नाही. मी नवघरला सातवी शिकलो आणि आठवीला भाईंदर सेकंडरी शाळेमध्ये गेलो. त्यावेळेला तिथे ज्या गाड्या होत्या. ती लोक तिथे रस्त्यावर आहेत. तिथे नगरपालिका किंवा ग्रामपंचायतीने कुठल्याही प्रकारची शेड बांधलेली नाही. आपण त्यांना सरळसरळ भाडेकरु म्हणून संबोधलेले आहे. साहेब, आपण रस्त्यावर बसणाऱ्या लोकांना भाड्याच्या पावत्या कशा दिल्या? ते सांगा. आपण आज अपंगांना बुथ देतो. मग आपण त्यांना महापालिकेच्या कार्यालयात घुसवणार का? हा कुठला न्याय आहे? आपण रस्त्यावर बसणाऱ्या लोकांना इमारत बांधून द्यायला आतमध्ये घुसवणे योग्य नाही.

**मा. सभापती सो. :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, ते ग्रामपंचायत काळापासूनचे भाडेकरु आहेत.

**रतन पाटील :-**

ते कुठल्या पध्दतीने किंवा कुठल्या बेसवर भाडेकरु आहेत? ते तरी सांगा. ती महापालिकेची इमारत होती का? आपण रस्त्यावरील लोकांसाठी पावत्या फाडतो. ते आपले भाडेकरु आहेत का?

**मा. सभापती सो. :-**

त्या विषयाबाबत सरपंचाना विचारायला जावे लागेल.

**रतन पाटील :-**

साहेब, या ठिकाणी सरपंचाचा विषय नाही. म्हणून तुम्ही विषय बदली करु नका. तिथे आपल्या महापालिका किंवा नगरपालिकेने, ग्रामपंचायतने शेड बांधलेली होती का? हे महानगरपालिकेचे आर्थिक धोरणाचा विषय आहे. महापालिकेचे जे काही आर्थिक नुकसान होत आहे किंवा महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे याला जबाबदार कोण आहे? तिथे बाजुलाच शिवसेनेची शाखा होती. तुम्ही ती शाखा तोडून आम्हाला आजपर्यंत शाखा दिलेली नाही. तुम्ही आम्हाला त्यावेळेला शाखेसाठी वरचा संपूर्ण मजला देऊ असे सांगितले. परंतु, तुम्ही आम्हाला अजुनपर्यंत वरचा माळा दिलेला नाही. तुम्ही ती संपूर्ण शाखा तोडली आणि आता रस्त्यावर बसणा-या फेरिवाल्यांना आतमध्ये घालता हे योग्य नाही.

**मा. सभापती सो. :-**

तुम्ही शाखेसाठी भांडत आहात का?

**रतन पाटील :-**

मी शाखेसाठी भांडत नाही. मी एक उदाहरण देतो. तुम्ही रस्त्यावरील फेरिवाल्यांना आतमध्ये घातले आणि शिवसेनेतील शाखेच्या लोकांना उघड्यावर ठेवले. मी शाखेबाबत बोलत नाही. परंतु, तुम्ही त्यांना जो न्याय दिलेला आहे. तो न्याय कुठल्या बेवसर दिलेला आहे. या ठिकाणी ते सरळसरळ अतिक्रमण करुन आतमध्ये घुसले असे लिहलेले आहे. महापालिकेला त्या लोकांना बाहेर काढायची क्षमता नव्हती का? हा सर्व कारभार महापालिकेच्या काळात झालेला आहे. महापालिकेकडे हे अतिक्रमण कोणी केलेले आहे? त्याच्यावर कार्यवाही करण्यासाठी समोर पोलिस स्टेशन आहे. परंतु, त्या अतिक्रमणवर कुठलीही कार्यवाही केलेली नाही. आज त्या लोकांनी कोर्टात जाऊन महापालिकेचे आर्थिक नुकसान केलेले आहे.

**मा. सभापती सो. :-**

त्या लोकांकडे जुन्या पावत्या असतील ना.

**रतन पाटील :-**

तुम्ही जुन्या पावत्या कुठल्या आहेत? ग्रामपंचायतने तिथे शेड बांधलेली होती? जर शेड बांधलेली होती तर मला त्याबाबत मा. उपायुक्त साहेबांनी निवेदन करावे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही गोषवारा बघितलेला आहे का?

**रतन पाटील :-**

मी तुम्हाला गोषवारा एकायचा असेल तर मी वाचून दाखवतो. गोषवारा वाचलेला आहे. मी त्या गोषवा-यावर मार्क केलेले आहे. मी महापालिकेबाबत कुठल्याही आकसाने किंवा काहीही व्यक्तीगत बोलत नाही. मी महापालिकेच्या आर्थिक धोरणाबाबत बोलत आहे. आज महापालिकेचे आर्थिक नुकसान केलेले आहे. आपल्याला ह्या लोकांनी कोर्टात खेचलेले आहे. मग आपण या लोकांसाठी काय न्याय करायचा? ते सांगा. आता हे कोर्ट मॅटर आहे. आपण इथे केसेस हरतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वकीलांचा एवढा मोठा स्टाफ असताना आपण किती केसेस जिंकलेल्या आहेत? ते सांगा. आपण ह्या केसेससुद्धा हरलेले आहोत. आपण हायकोर्टात केसेस सादर केलेल्या आहेत. आपण तिथेसुद्धा केसेस हरलेले आहोत. आपले वकील काय करतात? आपले वकील महापालिकेकडून फक्त पैसेच घेतात का? आपले वकील केसेसला हजर राहत नाहीत. मग ह्या केसेस कशाला लढवायच्या? साहेब, ह्याच्यामध्ये न्यायाचा प्रश्न आहे आणि आर्थिक धोरणाचा विषय आहे. जर तुम्हाला हा विषय टाळायचा असेल तर तुम्हाला हा विषय पुढच्या वेळेला घ्यायचा असेल तर पुढच्या वेळेला घ्या.

**दिपक खांबित :-**

हा विषय गाळा क्र. १४ बाबतचा आहे. दि. २८/११/१९८० रोजी भाईंदर ग्रामपंचायतीने त्यांना तिकडे जागा मंजूर केलेल्या आहेत. तिकडे एकूण १५ लोकांना जागा दिलेली होती. आणि त्या लोकांनी तिकडे स्वतःच्या खर्चाने शेड बांधलेल्या होत्या. सन १९७९-८० मध्ये त्यांना जागा दिलेल्या होत्या. रस्ता रुंदिकरण म्हणजे ६० फुटचा रस्ता करतेवेळी तत्कालीन मुख्याधिकारी यांनी त्यांना दि. १५/५/२००० रोजी पत्र दिलेले होते. मी तुम्हाला ते पत्र वाचून दाखवू का? (पत्राचे वाचन केले.) त्यांना हे पत्र दिल्यानंतर त्यांनी दुकाने काढली. आपण त्यानंतर त्या लोकांकरिता समोर बिल्डिंग बांधली. परंतु, आपण त्यावेळेला त्यांचे भाडे फिक्स केलेले नव्हते. आपण ते भाडे फिक्स करण्यासाठी कलेक्टरकडे पाठवलेले होते. दरम्यानच्या काळात महानगरपालिका स्थापन झाली. त्याच्या आधी पंधरा लोकांनी ताबा घेतला. आपल्याकडे त्या लोकांनी ताबा नोंद नाही.

**शशिकांत भोईर :-**

माझ्या माहितीप्रमाणे हा विषय स्थायी समितीमध्ये मंजूर केलेला होता. त्यानंतर त्याचा ड्रॉ काढून नंतर गाळ्यांचे वाटप केलेले होते. त्यावेळेला आपले नगरविकास अधिकारी सुद्धा हजर होते.

**रतन पाटील :-**

साहेब, दि. २८ ला नगरपालिका संपून महापालिका झालेली होती आणि नगरपालिका संपलेली होती. त्यामुळे त्या लोकांना महापालिका झाल्यामुळे तुमचे काही चालणार नाही. असे सांगणारी कोणी गूरू किंवा भट भेटली असेल.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण त्याच्यानंतर हा विषय महासभेत घेतलेला होता. आपण महासभा ठराव क्र. ३८ दि. २०/११/२००२ रोजी धोरण निश्चित केलेले होते. आपण त्या धोरणामध्ये ही सर्व दुकाने देण्यासाठी काय-काय अटीशर्तीच्या पुर्तता करायच्या आहेत. त्या निश्चित केल्या. आपण त्या गाळ्याचे भाडे रु. २१/- स्क्वेअर फुट असे ठरवलेले होते. रु. २१/- स्क्वेअर फुटप्रमाणे रु. १०००/- महिन्याचे भाडे होते आणि रु. दिड लाख डिपॉझिट होते. आपण त्यांना त्याप्रमाणे कळवलेले होते. आपण त्यांना त्याची पुर्तता करा आम्ही तुम्हाला रितसरपणे गाळा देतो असे सांगितले. परंतु, त्यांनी त्याच्यापूर्वी आपल्या विरुध्द कोर्टात जाऊन स्टे घेतलेला होता.

**रतन पाटील :-**

आपल्यावर स्टे आहे का? जर आपल्यावर स्टे असेल तर आपण कार्यवाही का करीत नाही?

**दिपक खांबित :-**

आपल्यावर स्टे नाही. ते ठाणे कोर्टात केस जिंकल्यावर त्यावरती आपण हायकोर्टात आपिल केलेले आहे. आता हायकोर्टात सन २००१ च्या केसेस चालू आहेत. आपल्या केसला दोन वर्षे लागतील.

**रतन पाटील :-**

आणखी दोन वर्षे लागतील का? तोपर्यंत आपले आर्थिक नुकसान होईल.

**दिपक खांबित :-**

आमचे एवढेच म्हणणे आहे की, पूर्वी ती लोक टपऱ्यांमध्ये राहत होते. परंतु, आता महापालिकेने रु. १० लाख खर्च करुन गाळे बांधलेले आहेत. आम्हाला त्या हिशोबाने पैसे मिळायला पाहिजेत. एवढीच आपली मागणी आहे. आपण त्यांना सन २००० मध्ये पत्र दिलेले होते. त्यामुळे आपण त्यांना गाळे द्यायला बांधले आहोत. आपण त्याच्यामधूनच बनवलेले आहे.

**रतन पाटील :-**

शहरामध्ये बऱ्याचशा ठिकाणी गाळेधारक आहेत. आपण त्यांनासुध्दा जागा दिलेली आहे.

**दिपक खांबित :-**

परंतु, आपण या गाळेधारकांना पत्र दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

महापालिकेला खर्च करीत असताना आपण त्यांना आतमध्ये बसविणे योग्य नाही. हा कुठला न्याय आहे?

**दिपक खांबित :-**

हे सन १९७९ पासूनचे भाडेकरु आहेत आणि यांना महानगरपालिकेने पत्र दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

मी पत्र दिलेले होते. त्यांनी त्या पत्राला जुमानले का? मग ते कोर्टात का गेले?

**दिपक खांबित :-**

कोर्टामध्ये काय ते फायनल होईल.

**रतन पाटील :-**

आता त्या जागेवर कोर्टात स्टे आहे का?

**दिपक खांबित :-**

ती लोक केस जिंकलेली आहेत.

**रतन पाटील :-**

सगळ्या केसेस न जिंकता दोनच केस जिंकल्या असे तुम्ही आम्हाला सांगितलेले आहे.

**दिपक खांबित :-**

दोनच केस जिंकलेल्या नाहीत.

**रतन पाटील :-**

तुम्ही दोनच केसेस जिंकल्याबाबत सांगितलेले आहे. तुम्ही या ठिकाणी वाचून बघा.

**दिपक खांबित :-**

दोन केस न जिंकता नऊ केस जिंकलेल्या आहेत. एकूण पंधरा लोक होती.

**रतन पाटील :-**

श्री. निलेश मोहिले आणि श्री. रमेश हरिवंश जोशी ह्यांनी उच्च न्यायालयाचा दावा लागेपर्यंत महापालिकेचे चार चार महिने गाळे देणेबाबत आदेश दिलेले होते. हे दोघे जिंकलेले आहेत.

**दिपक खांबित :-**

वरचे दहा लोक ठाणे कोर्टात गेले आणि श्री. निलेश मोहिले आणि श्री. रमेश जोशी यांनी पी.आय. दाखल केलेली होती. ह्याच्यामध्ये हायकोर्टाने त्यांना महानगरपालिकेतर्फे टर्म्स ॲन्ड कन्डिशन ठरवून चार महिन्याच्या गाळ्याचे वाटप करण्याचे आदेश दिलेले होते. परंतु, एकूण पंधरा लोकांपैकी दहा जण कोर्टात गेलेले होते आणि ह्या दोन लोकांनी दहा जणांच्या केसमध्ये जो काही निकाल लागेल. आम्ही त्याप्रमाणे तुमच्याकडे भाडे भरु असे त्यांनी आम्हाला पत्र दिलेले होते. आम्ही त्याप्रमाणे या बाकीच्या पाच जणांनासुध्दा गाळे दिलेले आहेत. त्यांनी त्याच्यावर ठराव करायचा आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्हाला उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. आपण त्यांना त्यापध्दतीने लिहून, आपण त्यांना भाडे लागू करायला पाहिजे. त्यांना दहा जणांशी काहीही देणं-घेणं नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, आम्ही तो विषय दि. २७/६/२००३ च्या स्थायी समितीमध्ये ठेवलेला होता. त्यांनी स्वतःच उरलेल्या पाच लोकांनासुध्दा गाळे देण्याचा ठराव केलेला होता. त्यांच्या केसमध्ये जे लागू आहे. तुम्ही त्यांच्याकडूनसुध्दा भाडे घ्यायचे. आपण ह्या अटीशर्तीसुध्दा दिलेल्या होत्या.

**रतन पाटील :-**

आपली जागा वगैरे सर्व आपले असून आपण सर्व खर्च करित असताना आपण सगळ्या केसेस हरतो. तग आपले वकील काय करतात? आपले वकील इकडे उभे राहत नाहीत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याला या वकीलांना मुदतवाढ देता येणार नाही. तुम्हाला अपील करायचे असेल तर करु शकता.

**दिपक खांबित :-**

साहेब, ही चौदा लोकांची वेगळी केस आहे. सोळा गाळ्यांपैकी पंधरा गाळे आहेत आणि एकजण रीकामी आहे.

**रतन पाटील :-**

सोळा गाळे नसुन सतरा गाळे आहेत. हा एक गाळा आणि गणपती बसतो तो कुठला गाळा आहे?

**दिपक खांबित :-**

तो गाळा ओपन आहे. आपण त्याची गाळ्यामध्ये मोजणी करु शकत नाही.

**रतन पाटील :-**

तो गाळा कशासाठी आहे?

**दिपक खांबित :-**

तिथे बाजुला बालवाडी आहे. त्यांचे सामान ठेवण्यासाठी गाळा वापरला जातो. आता तिथे एक गाळा रिकामी आहे.

**रतन पाटील :-**

आम्ही तो विषयसुध्दा घेऊ. प्रथम हा क्लिअर करा.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण हा गाळा एक वर्षासाठी रु. १/- प्रमाणे भाड्याने दिलेला होता. परंतु, आता त्यांची मुदत संपलेली आहे. त्यांनी त्या गाळ्याबाबत पुन्हा मुदतवाढ मागितलेली असल्यामुळे आम्ही हा विषय पुन्हा आणलेला आहे. हा विषय फक्त एका गाळ्यासाठी आहे.

**रतन पाटील :-**

आपण या पंधरा गाळ्यांचे काय करणार आहोत? ते तुम्ही प्रथम आम्हाला सांगा. आपले वार्षिक नुकसान किती लाख रुपयाचे आहे? ते सांगा माझ्या माहितीप्रमाणे आपले वार्षिक रु. ३१ लाखाचे नुकसान होणार आहे.

**दिपक खांबित :-**

याबाबत कोर्टात केस चालू आहे.

**रतन पाटील :-**

आपल्या वकिलांनी काय केले? किती वकिल कुठे कसे जिंकले, हरले या सगळ्याचे मला करस्पॉन्डन्स दया.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, वकिलाच्या कामकाजाचा एक विषय घ्या.

**रतन पाटील :-**

वकिल कोर्टामध्ये किती हजर राहिले? किती वेळा केस लढले? त्याची संपूर्ण माहिती मिळण्यासाठी वकिलाच्या कामकाजाचा एक विषय घ्या. साहेब, रतन पाटील स्वतःचे घरचे बोलत नाही व घरासाठी बोलत नाही. हे महापालिकेचे आर्थिक धोरण आहे. आपण बजेटमध्ये भुईभाड्याची वगैरे तरतुद करतो. परंतु, ते सर्व काही ह्याच्यामध्ये येते की नाही. मी हा वैकुंठभूमीचा विषय मांडलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, हा विषय फक्त वैकुंठधाम सामुग्री किंवा भांडारापुरताच आहे. याच्यावर रु. १/- भाडे आकारलेले आहे. याच्यामध्ये जे काही दुसरे विषय घुसविलेले आहेत. त्यांचा याच्याशी संबंध येत नाही. आपल्याला त्यांना भाडेवाढ करुन दयायची नाही. आपण नंतर सविस्तर विषय आणा. कारण तिकडे १४ भाडेकरु सुद्धा आहेत.

**दिपक खांबित :-**

मागच्या वेळेला मागणी केलेली होती आणि सर्व माहिती घेऊन विषय आणलेला होता.

**रतन पाटील :-**

मागच्या वेळेला स्थायी समितीने मागणी केलेली होती.

**शशिकांत भोईर :-**

प्रकरण क्र. ९० भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय इमारतीसमोर भाडेकरुकरिता बांधलेल्या इमारतीमधील हिन्दु वैकुंठधाम सामुग्री भंडार यांना भाड्याने दिलेल्या गाळ्याची मुदत वाढविणे असा विषय दिलेला आहे. जर दुसरे विषय असतील तर तेसुद्धा विषयपत्रिकेवर सविस्तरपणे येऊ दे.

**रोहिदास पाटील :-**

दुसरे विषय नाहीत. आम्ही त्या अजेंड्यावर बोलू शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

मग तुम्ही याला मुदतवाढ दया. मला बोलतायेते म्हणून बोलत रहायचे याचा फायदा नाही. आता विषयांतर नको आहे. विषय पुन्हा विषयपटलावर आणा.

**रतन पाटील :-**

साहेब, मागच्या वेळेला वैकुंठधामच्या सामुग्री भांडाराचा विषय चर्चेला गेलेला होता. मला बोलता येते म्हणून मी बोलत नाही. ही ट्रस्ट आहे का? हे तुम्ही प्रथम मला सांगा.

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी अल्मेडा यांनी ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

या ठरावामध्ये मंजूरी देण्यात येत आहे हे बरोबर आहे. परंतु, हे ट्रस्ट आहे का?

**मा. सभापती सो. :-**

वैकुंठधामच्या एका गाळ्याला मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही वैकुंठधामच्या गाळ्यासाठी तीन वर्षाची शिफारस घ्या. माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

त्याच्यामध्ये असे नमुद करा की आज आमची भाईंदर (पूर्व) येथे परिहीत सेवा संघ आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे परिहित सेवा संघ आहे. परंतु, या ठिकाणी कुठला विषय चाललेला आहे? त्याचा सुद्धा विचार करा.

**रतन पाटील :-**

तोच विषय आहे.

**जयंत पाटील :-**

गाळ्यांचा विषय चालू आहे.

**मा. सभापती सो. :-**

हा विषय एका गाळ्यासाठी मर्यादित आहे.

**रतन पाटील :-**

मला जे काही बोलायचे आहे ते तुम्हाला माहिती नाही.

**जयंत पाटील :-**

हा स्मशानभूमीचा विषय नाही. इतके वर्षे असलेल्या वैकुंठधाममधील सामुग्री भांडाराचा विषय आहे हा स्मशानाचा विषय नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही माझे ऐकून घेतले तर मी तुम्हाला सांगू शकेन ना.

**मा. सभापती सो. :-**

तुम्हाला काय बोलायचे असेल ते बोला.

**रतन पाटील :-**

आपल्या कडे भाईंदर (पूर्व) येथे परिहीत सेवा संघ आहे. ज्या पद्धतीने आपण पत्र पाठवून कोणत्याही गरिब व्यक्तीला मेले तर आपल्याला ती व्यक्ती फुकटात दहनाची लाकडे देते. आणि हा जो आहे ह्याच्या

पद्धतीने नगरसेवक किंवा अधिकाऱ्यांनी पाठवले तर दहनाची लाकडे देत नाही. त्याच्यामध्ये हे सर्व नमुद करून घ्यावे. जर नगरसेवक किंवा अधिकाऱ्यांनी तसे पत्र दिले तर तो कुठलाही गरीब माणूस किंवा बेवारस माणूस असला आणि त्याबाबत कुठल्याही व्यक्तीने पत्र पाठवले तर त्याचा दहनासाठी फुकटमध्ये लाकडे दिली जावीत असे नमुद करा.

**रोहिदास पाटील :-**

ती लोक लाकडे देत नाहीत.

**रतन पाटील :-**

हाच माणूस लाकडे देतो. ह्याच्याकडेच पावती फाडली जाते.

**जयंत पाटील :-**

श्री. दिपक खांबित, जर तिथे गाळा असेल तर लाकडे ठेवायला दया.

**एस.ए.खान :-**

गाळा असेल तर द्या.

**दिपक खांबित :-**

तुम्ही कुठे गाळा द्या? असे सांगता.

**रतन पाटील :-**

मी वैकुंठधामबाबत बोलत आहे. हा माणूस लाकडाची पावती कुठे फाडतो? ते नमुद करा आज आपल्याकडे भाईंदर (पूर्व) ला अशी पध्दत आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यात न टाकतासुद्धा आपल्याला करून घेता येईल.

**रतन पाटील :-**

साहेब,तो माणूस ऐकत नाही.

**मा. सभापती सो. :-**

तो माणूस लाकडाचे काम करीत नाही. तुम्ही विषय काढला म्हणून सांगतो की तो माणूस लाकडे न देता सामान देतो. आता जो बॉम्बस्फोट झाला तिथे त्याच्यामध्ये सगळी स्मशानभूमीची लाकडे गेलेली होती त्यांना त्यावेळेला पैसे मिळालेले नाहीत. माझ्याकडे त्या लोकांचा अर्ज आलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

निर्णय तुम्ही द्यायचाय.

**रतन पाटील :-**

कोणी केला अर्ज?

**जयंत पाटील :-**

तुम्ही विषय घ्या आणि तुम्हीच निर्णय द्या. आम्ही तुमच्या गोष्टींशी सहमत आहोत.

**रतन पाटील :-**

जर कुठलाही मृतदेह बेवारस असेल तर तुम्ही नगरसेवकांनी त्याचा सन्मान केला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांचे म्हणणे बरोबर आहे. आपण रु. १/- या नाममात्र भाड्याने गाळा दिलेला आहे. तर त्या माणसाने गरिब लोकांना सहकार्य करायला पाहिजे.

**प्रकरण क्र. ९० :-**

भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय इमारतीसमोर भाडेकरु करीता बांधलेल्या इमारतीमधील ''हिंदू वैकुंठधाम सामग्री भंडार'' यांना भाड्याने दिलेल्या गाळ्याची मुदत वाढविणेबाबत.

**ठराव क्र. ९२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत तत्कालीन नगरपरिषद असताना छत्रपती शिवाजी महाराज मार्ग रस्ता रुंदीकरण करतेवेळी जुन्या नगरपरिषद कार्यालयासमोर तत्कालीन नगरपरिषदेचे असलेले भाडेकरू ना पर्यायी व्यवस्था करण्याबाबत पत्र देण्यात आले होते. त्यानुसार सदर भाडेकरू करीता नविन इमारत बांधण्यात आली. सदर इमारतीमधील गाळा क्र. १४ मा. स्थायी समिती सभा दि. २७/०६/२००३ ठराव क्र. ७४ अन्वये रू. १/- नाममात्र भाड्याने ''हिंदू वैकूंठधाम सामग्री भंडार'' या संस्थेस देण्याबाबत निर्णय घेण्यात आला त्यानुसार सदर संस्थेशी करारनामा करून एक वर्ष मुदतीकरिता भाड्याने गाळा देण्यात आला होता. वरील गोषवारा पाहता मे. हिंदू वैकूंठधाम सामग्री भंडार या संस्थेस जूना करारनामा आल्यापासून पुढील तीन वर्ष मुदती करीता करारनामा करून व भाडे आकारून गाळा भाड्याने देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्री. रोहिदास शं. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९१ चे वाचन केले.)
(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी ठरावाचे वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**
इस ठरावको मेरा अनुमोदन है।

**मा. सभापती :-**
सदर विषय मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ९१ :-**
निविदांना मंजुरी देणे (बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ९३ :-**

| अ. क्र | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १. | भाईंदर (पू) धक्क्यापर्यंतचा रस्ता रुंद करणे.<br>१) मे. गणेश डेव्हलपर्स<br>२) मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी<br>३) मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कंपनी<br>४) मे. रमेश ॲन्ड असोसिएट | रु. ४,९६,७९८/-<br>७.००% जास्त दराने<br>५.००% जास्त दराने<br>६.५०% जास्त दराने<br>७.५०% जास्त दराने |
| २. | भाईंदर (पू) रेल्वे समांतर रस्ता तयार करणे.<br>१) मे. ओम कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी<br>४) मे. गणेश डेव्हलपर्स | रु. १६,४५,१४३/-<br>९.००% जास्त दराने<br>७.३०% जास्त दराने<br>४.९९% जास्त दराने<br>६.००% जास्त दराने |
| ३. | भाईंदर (पू) ओस्तवाल ओनिक्स ते रो हाउस पाठीमागील रस्ता तयार करणे.<br>१) मे. ओम कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>३) मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी<br>४) मे. गणेश डेव्हलपर्स | रु. २५,००,८२३/-<br><br>८.००% जास्त दराने<br>९.००% जास्त दराने<br>७.००% जास्त दराने<br>५.००% जास्त दराने |

| अ. क्र | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १. | भाईंदर पूर्व व पश्चिम चौपाटीवर व्हिडीयो शुटींग केबल ऑन लाईन प्रक्षेपण करणे समुद्रात मोठाले लाईटिंग व्यवस्था करणे, फोर क्लीफ्ट व्यवस्था, फस्ट एड, शिडी व्यवस्था, नाश्ता इ. व्यवस्था करणे. | रु. २,८२,८८५/- |

| अ.क्र. | तपशिल | प्रति | मे. ओम कंन्स्ट्रक्शन | मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | मे. एकता कंन्स्ट्रक्शन | मे. एम. एस. एन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | व्हिडिओ शुटींग केबल ऑन लाईन प्रक्षेपण करणे. | प्रति दिन | १०,१००/- | १०,०००/- | १०,५००/- | १०,२५०/- |
| २. | समुद्रात मोठाले लाईटिंग व्यवस्था करण | नग | १०,१००/- | १०,०००/- | १०,५००/- | १०,२५०/- |
| ३. | फोर क्लीफ्ट | नग | १६,०००/- | १५,०००/- | १५,६००/- | १५,८००/- |
| ४. | पान विडा | नग | १४.५०/- | १३/- | १६/- | १५/- |
| ५. | निवेदक | प्रति दिन | ५,६००/- | ५,०००/- | ६,२००/- | ६,१९९/- |
| ६. | व्हेज नास्ता पॅकेट | नग | २३/- | २०/- | २४/- | २६/- |
| ७. | टी शर्ट | नग | १११/- | १००/- | १२५/- | १२०/- |
| ८. | बॅच | नग | १८/- | १५/- | २५/- | २६/- |

वरील पैकी अ. क्र. १ च्या कामी मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.००% जास्त दराची निविदा, अ. क्र. २ च्या कामी मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा, अ. क्र. ३ च्या कामी मे. गणेश डेव्हलपर्स यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.००% जास्त दराची निविदा अ. क्र. ४ च्या कामी मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची निविदा ह्या वाजवी असून सदर निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ (क) नुसार मंजूरी देण्यात येत आहे. तसेच ठेकेदारांची वेळोवेळी येणाऱ्या देयकांच्या प्रदानास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदन :- श्री. हंसुकुमार पांडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९२ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

या विषयाला प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यापूर्वी मी बोलू इच्छितो की आपला जो हस्तांतरित केलेला रस्ता आहे. त्याबाबत आपल्याला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पत्र आलेले आहे का? जर ते पत्र आलेले असेल तर वाचून दाखवा.

**दिपक खांबित :-**

शासकिय निर्णय टी.एन.ए./२००६ प्रकरण क्र. ११ दि. २२/६/२००६ सार्वजनिक बांधकाम विभागाचे पत्र आहे. (पत्राचे वाचन केले.) ह्या जी.आर. प्रमाणे रस्ता हॅन्ड ओवर करायचा आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण त्याला फी वगैरे ठेवलेली आहे का?

**दिपक खांबित :-**

आपण फी वगैरे काहीही ठेवलेली नाही. सगळे आपल्याकडे हॅन्ड-ओव्हर करायचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

जिल्हा परिषदेने डागडूजी केलेली असेल ना.

**दिपक खांबित :-**

त्यांनी ते बघायचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला त्या लोकांचे पैसे द्यायचे आहेत का?

**दिपक खांबित :-**

आपल्याला त्या लोकांचे काहीही देणे नाही.

**मा. सभापती सो. :-**

आपल्याला काहीही द्यायचे नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपण एखाद्या लाखाची निविदा मंजुर केलेली होती. एवढा खर्च केलेला होता आणि तो सगळा खर्च भरावा लागेल असे काहीही नाही ना.

**दिपक खांबित :-**

आपण तो रस्ता जसा होता तसा घेतलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण तो रस्ता तेवढा होता तेवढा घेतलेला होता का?

**दिपक खांबित :-**

आपण तेवढाच रस्ता घेतलेला होता.

**शशिकांत भोईर :-**

तो रस्ता किती बाय किती फुटाचा आहे?

**दिपक खांबित :-**

तो पे ॲन्ड पार्कचा रस्ता आहे. सुभाषचंद्र बोस मैदान ते जो डोंगरीचा धारावी रोड जातो तिथपर्यंत ३० मीटरचा रस्ता आहे आणि त्याच्यापुढे १८ मीटरचा रस्ता आहे.

(सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा यांनी ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ९२ :-**

कामांस प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ९४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत खालील नमुद ठिकाणी विद्युत फिटिंग व इतर आवश्यक कामे करावयाची आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मुख्य कार्यालय इमारत, नगरभवन, खारीगांव व भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय येथे विद्युत व इतर कामे करणे. | रू. ११,२०,१०१/- |
| २. | भाईंदर उत्तन-गोराई रस्ता दुरूस्ती व पुर्न-पृष्ठीकरण करणे. | रू. ४९,००,०००/- |

सदर अंदाजपत्रकास अर्थिक व प्रशासकिय मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. जेन्वी आल्मेडा** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९३ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

या मिटींगला लेखा परिक्षक उपस्थित आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

लेखा परिक्षक रजेवर आहेत.

**रतन पाटील :-**

आपल्या महापालिकेच्या बजेटमध्ये सन २००२-०३ मध्ये ज्या गोष्टी किंवा ज्या उत्पन्नाच्या बाबी आहेत. त्याच्यामध्ये निश्चितच वाढ केली जाते. परंतु, त्याची वसुली होत नाही. खर्च मात्र तेवढा केला जातो. सन २००२-०३ चे अंदाजपत्रक वसुलीच्या बाबतीत आहे. तुम्ही या अंदाजपत्रकाची तरतुद बघा, खर्च बघा. तसेच, प्रत्यक्ष मिळालेली रक्कम आणि शिल्लक रक्कमसुध्दा बघा. सन २००२-०३ मध्ये रु. ३१ कोटीची घट आहे. सन २००३-०४ च्या अंदाजपत्रकाची तरतुद बघा. त्यात रु २१ कोटीची घट आहे. आपण ज्यावेळेला अंदाजपत्रक बनवतो. त्यावेळेला अधिका-यांना जवळ बोलावून प्रत्येक गोष्टीवर वाढवतो. हे-हे उत्पन्न येणार आहे या हिशोबाने तसे करतो. परंतु, त्याची पुर्तता होत नाही. अशापध्दतीने घट वाढता - वाढता पुढे चाललेली आहे. ती घट कमी झालेली नाही. सन २००२-०३-०४ ला ही घट वाढत गेलेली आहे. ह्याबाबतीत निश्चित काय भुमिका आहे?

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आपले मत मांडायचे आहे. तुम्हाला नक्की कुठे अडलय. आता तर तुम्ही तुमचे मत मांडा. हे तुम्हीच आणलेलं आहे ना. हे प्रत्यक्ष आकड्यांची पाहणीकरीता, विश्लेषणाकरीता महापालिकेच्या प्रशासनाच्या कामकाजात कोणत्या आडचणी आलेल्या आहेत? त्याचे निवेदन करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने मी या ठिकाणी निवेदन करतो की प्रशासनाकडून मागील दोन तीन वर्षाचा जमा आणि खर्च विचारात घेऊन आपण चालू वर्षी आणि प्रस्तावित वर्षाचा अर्थसंकल्प तयार करतो. सदरचा अर्थसंकल्प मा. आयुक्तांच्या मंजुरीने स्थायी समितीसमोर सादर करतो. त्याच्यामध्ये स्थायी समितीमार्फत पुर्नविलोकन होऊन त्याच्यामध्ये काही विषयांचे अपेक्षित उत्पन्न आणि मिळालेल्या उत्पन्नातील घट विचारात घेता ॲड व डिडक्शन करुन नव्याने त्याला मान्यता दिली जाते. ही मान्यता मा. आयुक्त साहेब जज करतात त्याच्यापेक्षा जास्तीची असते. आपण पाच वर्षाचा अभ्यास केला तर निश्चितच ती जास्तीची होते. तद्नंतर आपला अर्थसंकल्प महासभेमध्ये जातो. त्या ठिकाणीसुध्दा त्याच्यावर परिपूर्ण चर्चा होऊन त्याच्या अपेक्षित उत्पन्नात वाढ केली जाते. ह्या सगळ्याचा गांभिर्याने अभ्यास केला असता अशी परिस्थिती तयार होते की, दरवर्षीची प्रस्तावित कामे ही आपण अपेक्षित उत्पन्नाला अपेक्षित करुन करतो. आपण निव्वळ खर्च अपेक्षित अर्थसंकल्पीय उत्पन्नाच्या बाहेर करत नाही. तरी आपली प्रस्तावित कामे जास्तीची होतात. सन्मा. सदस्यांना याची कल्पना आहे. खर्च हा देय रक्कमेतुन केला जातो. परंतु, नियोजन जास्तीचे केले जाते. तुम्ही त्याचे जे

डेफिसिट असते. म्हणजे दरवर्षीचे जास्तीचे नियोजन प्रत्येक वर्षी कॅरी फॉरवर्ड होऊन आपले जे जास्तीचे देणे आहे ते आणि उत्पन्न कमी अशी परिस्थिती भविष्यात निर्माण होऊ नये म्हणून महालेखापालाने ज्यावेळेला त्यावेळेला ऑडिटची पाहणी केली. त्यावेळेला जे बजेट तयार केले जाते. ते रिॲलिस्टिक असावे. जमा-खर्च थोड्याफार मिळताजुळता असावा. उत्पन्नाची आणि विकासाची अपेक्षा निश्चितच व्हायला पाहिजे. त्याला ते थोडे रिॲलिस्टिक असावे अशी त्यांची सुचना आहे. आपल्या माहितीस्तव ती सुचना आपल्यासमोर आणलेली आहे. हा कामकाजाचा भाग आहे. आपल्याला एकदा ही माहिती मिळाली तर भविष्यात येणाऱ्या बजेटच्या वर्षात याच्यातुन प्रकर्षाने जाणीव करुन नियोजन करु.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, हा कामकाजाचा भाग नाही. हा शहाणपणाचा भाग आहे. मी आता टिपणी दिलेली आहे. या टिपणीमध्ये मा. आयुक्त सो. यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये मा. स्थायी समिती व मा. महासभेने वाढ सुचविल्याचे लेखा आक्षेपामध्ये नमुद केलेले आहे. आमचे म्हणणे आहे की हे शहाणपण फक्त आमचे नाही किंवा हे स्थायी समितीच्या सदस्यांचे आहे असे नाही किंवा हे महासभेचे आहे असेसुध्दा नाही. तुम्ही तुमचे आकडे मोजा. मा. आयुक्तांनी जेव्हा दिला रु. २०७/- कोटीचा आकडा मिळाला. तेव्हा तुमची प्रत्यक्ष वसुली किती आलेली होती? ते सांगा. तुमची वसुली रु. १५३/- कोटी आलेली होती. तुम्ही रु. १५३/- कोटीच्या ऐवजी रु. २०७/- कोटी तुम्हाला अनुभव आलेला असतानासुध्दा. तुम्ही पुढच्या वर्षाचे बजेट रु. २८१/- कसे दिले? हे सर्व काही इझीली घेतल्यामुळे असे घडलेले आहे. मा. सभापती महोदय, आम्ही सांगतो ते तुम्ही ऐकून घ्या. आम्ही बोलत असताना आम्हाला सन्मा. सदस्य जयंत पाटील बोलायला देत नाहीत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता कोणावर आरोप करु नका.

**रोहिदास पाटील :-**

हा विषय असा आहे की, ज्यावेळेला हा विषय सभागृहासमोर येतो. त्यावेळेला अंदाजपत्रक करताना प्रशासनाच्यावतीने किंवा मा आयुक्तांच्यावतीने सर्व अधिकारी मा. आयुक्तांचे खोटे रिपोर्टींग करतात. मा. आयुक्त बिचारे भोळेभाबडे असतात. ते त्याच्यावर सही करतात आणि ते दिल्यानंतर आम्हाला असे वाटते की, मा. आयुक्त हे भोळेभाबडे असल्यामुळे स्थायी समिती त्याच्यामध्ये वाढ करते. परंतु, स्थायी समिती भोळीभोबडी आहे असे समजून महासभा वाढवते. अक्षरशः सत्य परिस्थितीचा अनुभव न घेतल्यामुळे ही अशी परिस्थिती निर्माण होते. मा. आयुक्त साहेबांनी दिलेली टिपणी सन २००५-०६ ची आहे. त्यांनी अंदाजपत्रकीय तरतुद रु. २ कोटी ७१ हजाराची आणलेली आहे. २७१ कोटी प्रत्यक्ष रु. १५३/- झालेले आहेत. ह्याच्यामध्ये ११८/- कोटी ची तफावत आहे. मा. आयुक्ताचे अंदाज रु. २०७/- आहेत. मा. आयुक्त साहेबांनी जुना अनुभव विचारात घेतला तर मा.आयुक्तांनी त्यांचे अंदाजपत्रक रु. १५०/- कोटीच्यावर घेऊन जायला नको होते. त्यांनी रु. २०७/- कोटी केले. परंतु, आपण किती वाढवले? आपण रु. २७१/- कोटीऐवजी रु. ३६१/- कोटी केले. आपण मिळेल त्याला वाढवा म्हणतो तसे केलेले आहे. पहिल्यांदा मा. आयुक्त साहेबांचे अंदाजपत्रकसुध्दा चुकलेले आहे. ती स्थायी समितीने दिलेली फुगीर वाढ आहे. महासभेने उगीचच बेडकासारखे फुगवलेले आहे असे कुठेतरी यायला पाहिजे असा आमचा आग्रह आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यामध्ये मा. आयुक्तांचे अंदाजपत्रकात, मा. स्थायी समितीचे अंदाजपत्रक आणि मा. महासभेचे अंदाजपत्रक. मी असे म्हणत नाही की, आमचा फक्त मा. आयुक्त साहेबांच्या अंदाजपत्रकाला आक्षेप आहे. परंतु, आमचा सगळ्यांच्या अंदाजपत्रकाला आक्षेप नाही आहे. आपण ही बाब स्थायी समितीमध्ये प्रकर्षाने आणलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

खालच्या टिपणीमध्ये मा. आयुक्त साहेबांना मोकळे सोडून करण्याची आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्थायी समितीचा गैरसमज झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, हा गैरसमज नाही. या ठिकाणी अंदाजपत्रकीय तरतुद शिल्लक असे लिहलेले आहे. परंतु, या ठिकाणी शिल्लकचा नेमका काय अर्थ आहे? ते सांगा.

**रतन पाटील :-**

शिल्लक म्हणजे तुट.

**रोहिदास पाटील :-**

या ठिकाणी तीन शब्द झालेले आहेत. एक 'शिल्लक' शब्द आलेला आहे. तुम्ही दुसरा शब्द 'तुट' सांगता आणि तिसरा शब्द 'तफावत' सांगता. तिघांची वेगळी व्याख्या आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण जे काही अपेक्षित जे केले होते. ते होऊ शकलेले नाही. त्याला 'शिल्लक' म्हणतात.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपल्याकडे तुटसुध्दा आहे.

**मा. सभापती सो. :-**

मग आपल्याकडे उत्पन्न का होऊ शकलेले नाही?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

याच्यामध्ये प्रशासन किंवा निर्णयशक्ती हे वेगळे व्यासपीठ अपेक्षित नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुमच्यावर पूर्णपणे विश्वास टाकतो. स्थायी समितीमध्ये येण्यापूर्वी प्रशासनाने दिलेला म्हणतात ना जसे कोणतीही नशापाणी न करता रात्रंदिवस डोळ्यात तेल घालुन काम केलेले आहे अशातला तो भाग असतो. तुम्ही महापालिकेच्या कामकाजाचा अंदाज घेऊन जमेची बाजु खर्चाची बाजु याचे ताळेबंद करुन आमच्यासमोर आणता. मग आम्ही उत्साहाच्या भरात म्हणा किंवा आमच्या काही सुचना असतात. सगळे काही उत्साहाच्या भरात नाही. परंतु, सन्मा. सदस्य व्यवस्थित सुचना करतात असा आमचा अनुभव आहे. स्थायी समितीने केलेल्या सुचनासुध्दा चांगल्या झालेल्या आहेत व महासभेने केलेल्या सुचनासुध्दा चांगल्या असु शकतात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, आपण ह्याच्यासोबत सन २००० चा एक तक्ता दिलेला आहे. तो जर बघितला तर आणखी क्लिअर होईल. ह्याच्यामध्ये आपल्या महापालिके अंतर्गत विकास कामाच्या अनुषांगने जे काही नियोजन होते. ते ओव्हर एक्सरसाईज होते असा महालेखा परिक्षकांचा आक्षेप आहे.

**रोहिदास पाटील :-**

परंतु, ते कोण करते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

प्रशासनाने थोडे केले तरी स्थायी समिती व महासभेच्या ठिकाणी ती वाढ फार मोठ्या प्रमाणात होते. आम्ही दिलेली रक्कम आणि नंतरची रक्कम याच्यामध्ये मोठ्या फिगरचा फरक आहे. बापण सर्वजण चांगल्या उद्देशाने नियोजन करतो. आपल्या कामात अडचणी असतील किंवा नागरिकांच्या अडचणी असतील तर आपण अपेक्षित उत्पन्न चांगल्या भावनेने करतो. आपल्याकडे जी जमा रक्कम संपलेली आहे. त्याचे नियोजन होणे हा या मागचा उद्देश आहे. तसेच, आपले फायनान्शियल डिस्प्युट व्हायला नको असाही उद्देश आहे.

**रोहिदास पाटील :-**

रु. ३५०/- कोटीचे आपले बजेट आहे. आताच्या परिस्थितीमध्ये आपले रु. ३१९/- वसूल झाले का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आम्ही मागच्या वर्षाची जी तुट होती. त्या तुटीच्या अनुशंगाने या वर्षाच्या तरतुदीला भर करण्याचे आदेश काढलेले होते. हा त्याचाच एक भाग होता.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या नगरसेवकांना आणि नागरिकांना जी आशा वाटते की आतापर्यंत हे काम व्हायला पाहिजे पण अक्षरशः आपल्या पेटीत काहीही नसते.

**रतन पाटील :-**

तुमचं बरोबर आहे. प्रत्येक नगरसेवक हेच बोलतो की, आपले उत्पन्न वाढायला पाहिजे. ज्या इमारती आहेत त्यांना टॅक्स लागला पाहिजे. जे आपले विकास कर आपण मागच्या वेळेला वाढवलेले होते. ते व्यवस्थित रित्या जमा होत नाही.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, सामान्य नागरिक तुमच्याकडे बोट दाखवतो आहे. तुम्ही दरवर्षी तीनशे एकसष्ट कोटी रुपयांची व्हिलेवाट लावता. तुम्ही रु. तीनशे एकसष्ट चे बजेट दिले. तुम्ही तीनशे एकसष्ट कोटी संपवता आम्हांला ते दिसतच नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सर्व विभाग प्रमुखांना मा. स्थायी समिती च्या माध्यमातून येणारा बजेट हा रियलॅस्टिक बजेट करण्यासाठी आपण सुचना देणे अपेक्षित आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी लिस्ट दिली पाहिजे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याला त्यांनी तसे डायरेक्शन दिलेले होते.

**रोहिदास पाटील :-**

जमेची बाजू आणि खर्चाची बाजू त्यांनी प्रत्यक्ष मांडली पाहीजे. मग आम्ही सांगू शकतो की या ठिकाणी उत्पन्न वाढवा. हे खरे आहे की खोटे असेल तर तुम्ही ते घेतले नाही पाहिजे. आम्ही जे बोलतो. ते तुम्ही घेता. आम्ही तुम्हांला सांगतो हे खोटं आहे. तरी तुम्ही ऐकत देखील नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आम्ही ऐकत नाही असे समजू नका.

**शशिकांत भोईर :-**

माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, श्री. रोहिदास पाटील साहेब, यांनी जे म्हणणे मांडले ते योग्य आहे. ज्यावेळेस आम्ही लोक बजेट वाढवण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळेस प्रशासनाने दाखविणे गरजेच आहे. किंवा प्रशासनाने ती वसूली करणेही गरजेच आहे. आपण बऱ्याच विकास करामध्ये वसूली होत नसलेल्या रक्कमासुद्धा टाकतो. आता आम्ही नगरसेवक आहोत आम्हालासुद्धा बजेट वाढले पाहिजे आणि आमची विकास कामे व्हायला पाहिजे असे आम्हांला वाटते. परंतु, आज जो आक्षेपाचा गोषवारा आला हा गोषवारा आम्हांला आज मिळाला. व हा गोषवारा वर्तमानपत्रामध्ये अगोदर छापला जातो ही आमची नामुष्की आहे, की आम्हांला अगोदर घट व उत्पन्न किती आहे? न कळविता त्याबद्दलची माहिती पत्रकारांना आधी दिली जाते. ही सभागृहाची शरमेची गोष्ट आहे यामध्ये रु. १११ कोटीची नुसती घट दाखविलेली आहे. आणि आपण बोलतो की, आपल्याला ही काम करायची आहेत. ती कामे करायची आहेत. आता यामध्ये पत्रकाराने स्पष्ट आहे की, आपण विकास कर वसूली करत नाही. आता मी तुम्हांला हेड लाईन वाचून दाखवितो. आपण कारखाने आणि दुकानदारांच्या परवान्यांतून रु. ३ कोटी दाखविलेले होते. परंतु, आपण त्यांना जेव्हा परवानग्या किंवा परवाने देतो. आपण त्यांची प्रत्यक्षात वसूली करतो का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण वसुली शिवाय परवानेच देउ शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या महापालिकेत बरीच खाती आहेत त्या खात्यांची जबाबदारी आहे. या कारखानदाराने रिन्युव्हल केले नाही. किंवा ह्या कारखानदाराने परवानगी घेतलीच नाही. हे सुद्धा सक्तीचे करणे गरजेचे आहे. तेव्हाच आपली वसूली होईल. त्याचप्रकारे आपण शाळेचे भाडे रु. चार कोटी दाखविलेले आहेत परंतु, आपण काही शिक्षण अधिकाऱ्यांकडे किंवा शिक्षण मंत्रालयामध्ये वसूली करण्यासाठी गेलो की आपण कधीच गेलो नाही. फक्त आपली एवढे येणे आहे. त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. जसे आम्हाला एखादे विकास काम करायचे असेल तर आम्ही अधिकाऱ्यांच्या मागे लागून कामे करुन घेतो परंतु, आपण त्यावेळेस तसेच पाठीमागे लागून जर ह्या शाळेचे भाडे रु. चार कोटी आहे. ते जर मिळाले असते तर आपल्या उत्पन्नामध्ये नक्कीच वाढ झाली असती. त्याचप्रमाणे आपण दंडापोटी रु. ३ कोटी दिले. जकात दंड जो जकात कर्ता आहे तोच घेतो. आपल्याकडे कधी जमा झालेली दिसली नाही. १० पटीने असो किंवा १०० पटीने असो तोच घेतो. आपण त्याची कधी शहानिशा केलीत का? आपण अशी शहानिशा केली नाही आणि त्यावर आपण कधीच आक्षेप घेतला नाही. तो त्याच्या मर्जीप्रमाणे वसूल करतो आणि ठेवतो. त्याने आपल्याकडे जमा करणे गरजेचे आहे. आपल्या अधिकाऱ्यांनी ते आजपर्यंत जमा करुन घेतले आहे का? आपण रु. ३ कोटीची तिकडेच घट दाखविलेली आहे. त्याचप्रमाणे मालमत्ता विकास कराची प्रत्यक्षात वसुली असे लिहिलेले आहे. आपण मालमत्ता कराची अंदाजे वसूली रु. ५० कोटी दाखवितो. परंतु, प्रत्यक्षात रु. ३५ कोटीची वसुली होते. तिथे आपल्याला रु. १५ कोटीची घट होते. मग आपण या वसुलीसाठी काही लोकांवर लिलाव करणार होतो काही काहींची जप्ती करणार होतो. त्यांची काय कारवाई केली? काहीही करत नाही. त्यामुळे अशी घट वाढते त्याचप्रमाणे आपण रस्ते विकसित करण्यासाठी रु. ४८ कोटींचे कर्ज घेणार आहोत. या पत्रकारांच्या माहिती नुसार रु. ४८ कोटींचे कर्ज आहे. आपण तेसुद्धा दाखवलेले आहे. आपण कर्ज घेतलेले नाही. आपण कर्ज घेणार आहोत. म्हणजे आपण रु. ४८ कोटी आधीच दाखवायचे? त्यामुळे आपल्याला वाटते की, आपल्याजवळ पैसा खूप आहे. आपण कोणतीही विकास कामे हाती घेतो. आणि खर्च करतो त्यामुळे आपल्याकडे उत्पन्न आहे. तसे श्री. रोहिदास पाटील साहेब म्हणाले की आपण रु. ३६१ कोटी दाखविले तेवढे संपवायला पाहिजे होते. परंतु, आपल्याकडे प्रत्यक्षात तेवढी रक्कम जमा होईल का? अगोदर रु. ४८ कोटी हातात घ्या किंवा ते पास करा. विकास कामे हातात घ्या. व या वर्षात किती खर्च होईल? तेवढीच त्याच्यापर्यंत मर्यादा ठेवा. आपण रु. ४८ कोटी खर्च करणार आहोत. त्याच्यावर एका वर्षात रु. १० कोटी खर्च होणार आहे की, रु. १५ कोटी रु. खर्च होणार आहेत ते दाखवा. आपण कधी दाखवत नाही. त्याचप्रमाणे माझ्या माहितीनुसार आपले प्रत्यक्ष रु. १५३ कोटी रु. चे बजेट आहे. आणि आपण ५० टक्के बजेट जास्त दाखविलेले आहे. हौसेच्या भरात नगरसेवक व पदाधिकारी आम्ही विकास कामे करतो असे बोलून अनेक कामे काढतात. ती कामे करताना तुम्हीही कामे करताना कुठे तरी पायबंद घाला. जसे या वर्षात की ही कामे होणार नाही. आमच्या जवळ बजेट कमी आहे असे आणलेले आहे. त्याचप्रमाणे तुम्ही सन २००३-२००४ पूर्वी पासून आणायला पाहिजे होती. जसा आक्षेप घेतला. त्यामुळे त्यात आणखी घट झालेली आहे. त्यामध्ये माझी एक सुचना नमुद करुन घ्या की जे आपले ठेकेदार आहेत. त्यांच्यापैकी काही जणांची आत्तापर्यंतची थकबाकी बाकी आहे. आतापर्यंत दिलेलीच काही बिले नाही. ती आता आपली काम जास्त होतात. आपण कुठेही काटकसर केली पाहिजे. आता ज्यावेळेस खर्चात वाढ झाली तो मुख्य शिर्ष असेल. किंवा आपण कोणत्याही खात्याला मुख्य हेड खाली ते पैसे वर्ग केले. त्याची या गोषवाऱ्यामध्ये कुठे माहिती दिलेली नाही किंवा त्याचा कुठेही उल्लेख देखील नाही. त्यात प्रत्यक्ष कोणत्या लेखा-शिर्ष्याखाली किती वाढ झालेली आहे? बांधकाम पाणीपुरवठा किंवा आरोग्य खात्यामध्ये वाढ झालेही आहे

असे असेही कुठेच दिलेले नाही. तुम्ही आम्हांला फक्त एक पत्र दिलेले होते. आपण हा गोषवारा समजून मंजूरी घेणार आहोत की या गोषवाऱ्यावर आक्षेप घेणार आहोत त्याचप्रमाणे या लेखा संहितेप्रमाणे त्यावेळेस पुर्न नियोजन केले असेल किंवा मा. स्थायी समिती होती. त्यांची आपण मंजूरी घेतली होती का? जर मंजूरी घेतली असेल तर त्यावर आक्षेप होउच शकत नाही. आपण आज दोन - तीन वर्षानंतर आक्षेप घेतो की, आपल्याला ज्या त्रुटी दिसलेल्या आहेत त्यावर तत्कालीन मा. स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे का? त्याचाही प्रशासनाने खुलासा करावा.

**जयंत पाटील :-**

आपल्याला अंदाज पत्रकातुन आतापर्यंतची तुट दिसून आलेली आहे. त्याच्यात सर्वात जर काही कारण असेल तर प्रशासकीय अधिकारी ह्यांनी केलेला आहे. नगरसेवकांचा त्यामध्ये काही दोष नाही.

**रोहिदास पाटील :-**

सत्ताधारी पक्षाच्या संगमताने केला असेल.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्तसाहेब, आपल्या महापालिकेतून आपण फिरलात तर आपल्या महापालिकेतील एकही कार्यालय किंवा एकही ऑफिस असे नाही की ज्याला आपण कार्पोरेट ऑफिस म्हणावे अशी सगळी ऑफिसे आहेत असे आपल्याला आढळून येईल. हा खर्च तुम्ही म्हणता तुमचा खर्च वाढतो हा खर्च वाढलेला नाही का? त्याची आवश्यकता होती का? आज मंत्रालयाच्या ऑफिसमध्ये गेलो तर तिथे साध्या खुर्च्या आहेत, कलेक्टर ऑफिसमध्येही साध्या खुर्च्या आहेत म्हणजे मुळात जी आवश्यकता नसतानाही जो प्रचंड खर्च केलेला आहे. हा याचाच भाग आहे. आम्हांला प्रभाग समितीच्या माध्यमातून काम करण्यासाठी तुमच्याकडे तरतुद नाही. आपण अशा कामासाठी निधी प्रचंड प्रमाणावर वापरलेला आहे. त्याचं कारण हेच आहे. आज जी तफावत दिसते, प्रचंड प्रमाणात खर्च होतो. आपल्याकडे बजेटची तरतुद किती आहे? आपल्याकडे उत्पन्नाची तरतुद किती आहे? ॲक्चुअल उत्पन्न किती आहे? आम्ही याची पर्वा न करता सतत कामे करत जातो. त्यामुळे कुठल्याही कामांना प्रायोरिटी द्यायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, आजच्या बैठकीने आपल्याकडून काय अपेक्षा केलेली आहे? ते लक्षात घ्या. तुम्ही आज हा विषय का आणला?

**जयंत पाटील :-**

आपण हा विषय ठराव मांडून पास करुया.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, हा आक्षेपाचा भाग नाही. म्हणून मी बोलतो की त्यावेळेला तत्कालीन स्थायी समिती होती. तीची मंजुरी घेतलेली होती का? असा मी प्रश्न विचारलेला होता. परंतु, प्रशासनाने त्याचे उत्तर दिलेले नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी सन्मा. सदस्यांना माहिती देउ इच्छितो की कुठलेही बजेट विभागाच्या बाहेरचे असेल किंवा स्थायी समितीच्या पुर्नविलोकनाशिवाय कोणी करु शकत नाही किंवा तसे केले जात नाही. जर विभागाच्या बाहेरचे असेल तर आपण आवश्यकतेप्रमाणे महासभेचेसुध्दा पुर्नविलोन करतो. बजेट वापरण्यामध्ये इतर डिपार्टमेन्टने करावे किंवा मा. आयुक्तांनी करावे असे कधीही केले जात नाही. आपल्याला तसे कुठलेही आक्षेप नाहीत. आक्षेप असा आहे की, महापालिकेच्या कामकाजामध्ये आपण विकासाच्या अनुषंगाने अपेक्षा ठेवून नियोजन करतो. हा नियोजन करण्याचा भाग आहे. हे होत असताना आपला खर्चसुध्दा त्या उत्पन्नाच्या मर्यादेत व्हायला पाहिजे. अशी भुमिका आहे. खर्च हा उत्पन्नाच्या बाहेर जाउन केलेला नाही. आपण जे नियोजन करतो त्या नियोजनामध्ये उत्पन्न अपेक्षित धरुन जी प्रशासकीय मंजुरी देतो ती देताना कुठेतरी सर्वांना या बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे. आपला हा खर्च येणाऱ्या काळासाठी डेफिसीट होणार नाही या अनुषंगाने प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी याची दक्षता घ्यावी ही महालेखापालांचा मुख्या आक्षेप आहे. सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी चांगले विचार मांडलेले आहेत. ते अपेक्षित उत्पन्न ज्या विभागात निर्माण झालेले नाही त्याची शहानिशा होणे अपेक्षित आहे. त्यामुळे त्या विभागात किती प्रमाणात कमी पडलेले आहे. याचीसुध्दा चर्चा होणे अपेक्षित आहे. याबाबत स्थायी समितीने त्या विभागातला तशा सुचना कराव्यात हा त्या मागचा उद्देश आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुमचे यातील एक वाक्य महत्वाचे आणि बरोबर आहे. सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात सर्व विभागावर सुधारणा होणे अपेक्षित आहे हे बरोबर आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हाच मुख्य उद्देश आहे. याचा अर्थ असा आहे की, आमच्या स्तरावर सुचना देउन हा विषय संपवता येत नाही. हे आपल्याला माहित असणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी ह्याला उपसुचना करतो की, आता जो विषय आणलेला आहे. ह्या विषयाला वाचा फुटलेली आहे. हे सगळ्यांच्या लक्षात आलेले आहे. प्रशासनाची किती तरतुद आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हा मुख्य उद्देश आहे. हा ओपननेस आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता तुमचे ॲक्चुअल उत्पन्न आहे या शहराचे दोन तीन वर्षाचे किती उत्पन्न आहे ते बघा आणि तुम्ही डिपार्टमेन्टवाईस भविष्यातील उत्पन्नाचा सोर्स घ्या. तुमचे जे काही संभावित आहे त्याला अर्थसंकल्पीय मंजुरी आहे असे नाही. परंतु, या वर्षीचा सन २००७-०८ चा अर्थसंकल्प बनवितेवळी आपल्याला या या गोष्टींची दखल घ्यावी लागेल. अशा बाबी पुढच्या किंवा त्यांच्या पुढच्या वर्षी घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण बोलल्याप्रमाणे उत्पन्न किती यायला पाहिजे किंवा आपण का कमी पडलो किंवा आपल्याला काय अडचणी आलेल्या आहेत? त्याची विभागावाईस चर्चा व्हायला पाहिजे. आपल्याला भविष्यात अजुन कार्यक्षमतेने जास्तीचा निधी कसा उत्पन्न करता येईल? या बाबतचे आपले सजेशन घ्यायला पाहिजे आणि येणाऱ्या काळात त्या अनुरुप कार्यवाही व्हायला पाहिजे. अशी महालेखापालांची अपेक्षा आहे. जेणेकरुन आपले जे भविष्याचे बजेट आहे ते थोडे फार रिॲलॅस्टिक व्हायला पाहिजे. आपण जास्त प्लॅनिंग कारणे अपेक्षित नाही हा या भागाचा उद्देश आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याला पारदर्शक काम करायचे आहे ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

होय.

**रोहिदास पाटील :-**

मग तुम्ही पारदर्शक अशी टिपणी द्या. सन २००४ रोजी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी केलेली वाढ असे दिले म्हणजे आम्हाला सन्मा. सदस्य मोहन पाटील यांचे बजेट बोलता येईल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील या ठिकाणी व्यक्तीचा उद्देश नाही. तुम्ही विषयाला समजुन घेत नाही. कोणत्याही एका व्यक्तीने हा निर्णय केला जात नसून चर्चेमध्ये भाग घेणे वेगळे आहे आणि निर्णय होणे वेगळे आहे. एखाद्याचा सुझाव म्हणजे त्यांचेच प्लानिंग असे नसते. आपण हा निर्णय प्लॅटफॉर्मवर घेतो त्याच्यामध्ये व्यक्ती अपेक्षित नाही.

**रतन पाटील :-**

आपण सुझाव करतो .............

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांना बोलता येते म्हणून बोलायला मिळाले तर काहीही बोलतात. मस्करीने बोलले तर आम्हाला दुःख झाले.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

कदाचित विषयांतर होत होते म्हणून सन्मा. सदस्य रतन पाटील बोलले असतील. त्याच्यामध्ये पर्सनल काहीही नाही.

**रतन पाटील :-**

मी त्यांना त्यांचे उत्तर दुसऱ्या वेळेला देतो.

**रोहिदास पाटील :-**

त्यांच्या सुचना किती खोट्या होत्या? सन्मा. सदस्य रतन पाटील बोलले की उत्पन्न वाढवा.

**रतन पाटील :-**

आपण बजेटच्या मिटींगच्या वेळेला सर्व अधिकारी, सर्व सन्मा सदस्य असतो. आपण त्यावेळेला प्रत्येकाच्या सुचना घेतो. आता लायसन्स फी, आरोग्याच्या हॉस्पीटलची फी, दवाखान्याची फी, डॉक्टरांची फी वगैरे आपण प्रत्यक्ष बजेटमध्ये देतो. त्यांच्यावर कुठेही अंकुश नसताना तुम्ही ती फी का लावली? आपण प्रत्येक वेळेला ती फी वाढवत असतो. परंतु, फी वसुल केली जात नाही असे का? मग ती तुट होणार नाही का? ह्याच्यामध्ये प्रत्यक्षात प्रशासन हा कमी पडत आहे. प्रशासन मनावर घेत नाही. प्रशासन म्हणजे जे सर्व सन्मा. सदस्य उत्पन्नाच्या बाबीवर सुचवतात. ते मनावर घेत नाहीत आणि वसुली करत नाहीत. साहेब, आपण मागच्या वेळेला लाससन्सच्या बाबतीत काय उपाययोजना केली? ते सांगा. शिवाय, आपण किती वसुली केली? तेसुध्दा सांगा. आपले लायसन्सच्या बाबतीत रु. १० कोटी ते रु. १५ कोटी वाढणार होते. आपण ते घेत नाही. त्याला अजुनपर्यंत सुरुवात केलेली नाही.

**शशिकांत भोईर :-**

याच्यावर मा. सभापती साहेबांनी रुलिंग द्यावे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही मागच्या बजेटमधील विकास कर बघा. वसईला सिडकोचा विकास कर रु. ३५०/- आहे. आणि मुंबईला विकास कर रु. २५०/- आहे. आपणसुध्दा या ठिकाणी या वाढविलेले आहे. अजुन विकास कर लागु झालेला नाही. जो विकास कर आहे तोच आहे. आम्ही दोन चार वेळेला चौकशी केलेली आहे. तेव्हा तो विकास कर शासनाकडे प्रस्तावित असल्याचे समजले. शासन आपल्याला मंजुरी देईल. शासन नाही म्हणणार नाही. परंतु, आपल्याकडे ते लागु व्हायला पाहिजे. आजपर्यंत आपल्याला किती फाईल्स जातात? याचा विचार करा. आपल्या आताच्या आता ५०० फाईल्स गेलेल्या आहेत. हे कोणाचे नुकसान आहे? आपण बजेटमध्ये आर्थिक तरतुद केलेली आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

या ठिकाणी लेखापालांनी जो काही प्रस्ताव दिलेला आहे त्या संदर्भात सर्व विभागप्रमुखांना तशा सुचना द्या. जेणेकरुन अर्थसंकल्पात कुठलीही चुक होता कामा नये. ज्या पत्रकाराने पेपरला बातम्या दिलेल्या आहेत त्यांच्यावर मात करण्यासाठी सर्व खात्यांच्या विभागप्रमुखांना वॉर्निंग द्या आणि त्याप्रमाणे वसुली करुन घ्या. आपल्याला ज्या ज्या भागात उत्पन्न मिळणार आहे किंवा मगाशी सन्मा. सदस्य रतन पाटील सांगितल्याप्रमाणे आपण याठिकाणी असलेल्या फेरिवाल्यांवर कर लावला तर आपल्याला निश्चितच चांगले उत्पन्न मिळेल.

**शशिकांत भोईर :-**

मला प्रशासनाला एक प्रश्न विचारायचा होता की, आंम्हाला गोषवारा येण्यापुर्वी पेपरमध्ये त्याबाबत छापले जाते. मग पेपरवाल्यांना ही माहिती कशी पुरविली गेलेली आहे? ते सांगा. आंम्हाला ती माहिती आता मिळते. त्याच्यानंतर आंम्हाला एवढा खर्च असल्याची तफावत समजते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासनाकडून बाहेर कुठलीही माहिती गेलेली नाही.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, याठिकाणी सरळसरळ लिहिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही तपासून घेवु. परंतु, आमच्याकडून माहिती दिलेली नाही.

**शशिकांत भोईर :-**

याठिकाणी दिवाळखोरीच्या वाटेवर असे लिहिलेले आहे. म्हणजे आपण दिवाळखोरी केली तर आपण आपल्या कर्मचाऱ्यांचा पगार भरु शकत नाही. या गोषवाऱ्यानुसार ही सत्य परिस्थिती आहे आणि त्यांना ती माहिती आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही ओपन माहिती आहे. आपण ज्या वर्षीचे बजेट तयार करतो. आपल्या अर्थसंकल्पामध्ये मागील तीन वर्षाचा जमा आणि खर्च हा आपला आकडा आहे. हे ११८ ओपन आकडे आहेत.

**शशिकांत भोईर :-**

ओपन आकडे असू द्या. आमचा त्याच्याशी संबंध नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी आज नव्याने देतो असे नाही.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, त्यांना अगोदर माहिती पडलेले आहे आणि आंम्हाला आता गोषवारा देता हे योग्य नाही.

**जयंत पाटील :-**

परंतु, दिवाळखोरी झालेली आहे हे खरे आहे का?

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही दिवाळखोरी मान्य करता का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी दिवाळखोरी मान्य करित नाही. अर्थसंकल्पाचे आकडे ओपन आहेत. ते आपण अर्थसंकल्प मंजूर करतांना सर्वांना दिलेले आहेत.

**प्रकरण क्र. ९३ :-**

महालेखापाल कार्यालय लेखापरिक्षण अहवाल सन २००२/०३ मे २००३/०४ मधील पॅरा क्र. ५ बाबत.

**ठराव क्र. ९५ :-**

सन २००२/०३ ते २००३/०४ मधील महालेखापाल यांनी अर्थसंकल्पाबाबत खलीलप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतूद/प्रत्यक्ष जमा/प्रत्यक्ष खर्च याबाबत आक्षेप घेतलेला आहे.

**(आकडे लाखांत)**

| सन | | उत्पन्न | खर्च |
|---|---|---|---|
| २००२/०३ | अंदाजपत्रकीय तरतूद | ९८९४.१० | १०२९२.१० |
| | प्रत्यक्ष | ८७७२.२१ | ८७६२.७२ |

| सन | | उत्पन्न | खर्च |
|---|---|---|---|
| | शिल्लक | ११२१.८९ | १५२९.३८ |
| २००३/०४ | अंदाजपत्रकीय तरतूद | १५७६४.५१ | १५७६३.०० |
| | प्रत्यक्ष | १२५८९.२१ | ११५२३.४५ |
| | शिल्लक | ३१७५.३० | ४२३९.५५ |

वरीलबाबत मा. आयुक्तांनी मा. स्थायी समितीस सादर केलेल्या अंदाजपत्रकात मा. स्थायी समितीने व मा. महासभेने वाढ सुचविल्याबाबत आक्षेप नोंदलेला आहे.

तरी सन २००७/०८ पासूनचे नविन अंदाजपत्रक बनविताना मा. स्थायी समिती व मा. महासभा ही मागील तीन वर्षाचे प्रत्यक्ष जमा व प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी विचारात घेवूनच अंदाजपत्रकात वाढ/घट करेल. त्याची दक्षता घेतली जाईल.

**सुचक :- श्री. जेन्वी आल्मेडा** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसेविका जेन्वी आल्मेडा ह्यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९४ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

श्री. खांबितसाहेब, कोणत्या रस्त्याला नाव द्यायचे याचा गोषवारा दिलेला नाही.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी रस्त्याला नावे देण्याबाबत फक्त पत्र दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही रस्त्यांची जी नावे दिलेली आहेत. तुम्ही त्याचा गोषवारा द्यायला पाहिजे होता आणि नावांची यादी द्यायला पाहिजे होती.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही हा विषय रितसर नंतर घ्या.

**दिपक खांबित :-**

मा. सभापतीसाहेबांनी हा विषय घेतलेला आहे. त्यांच्याकडे दोन - चार जणांची पत्रे आलेली आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही हा विषय नंतर रितसर घ्या. आम्ही तुम्हाला हा विषय देतो.

**मा. सभापती सोा :-**

आमच्याकडे पत्रे आलेली आहेत.

**रोहिदास पाटील :-**

याठिकाणी कुठल्या रस्त्याला कुठले नाव द्यायचे? वगैरे काहीही दिलेले नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही प्रस्ताव व्यवस्थित आणा आणि नंतर रस्त्याला नावे द्या.

**दिपक खांबित :-**

त्यांच्याकडे पाच - सहा जणांचे प्रस्ताव आलेले आहेत. साहेब, त्यांचे प्रस्ताव आलेले आहेत. ते तुंम्हाला वाचून दाखवू का? कुठल्या रस्त्याला कुठले नाव द्यायचे याचे अर्ज आलेले आहेत.

**रतन पाटील :-**

रस्त्याला नाव देण्यासाठी कुणाची ना नाही. रस्त्याला नावे असावित पुर्वी पासून ज्या रस्त्याला आपण आधी नावे दिलेली आहेत त्याची अगोदर यादी येउ द्या.

**मा. सभापती सोा. :-**

त्याच्या बद्दल ठराव करून घ्या. कारण त्याच्यामध्ये चार रस्त्याची नावे आहेत.

**जयंत पाटील :-**

श्री. म्हात्रेसाहेब, तुम्ही आम्हाला गोषवारा दिलेला नाही. त्यामुळे आम्हाला कुठल्या रस्त्याला कुठले नाव द्यायचे? ते समजत नाही.

**मा. सभापती सो. :-**

आपण ह्या विषयाची शिफारस करू या.

**दिपक खांबित :-**

मग आपण ही शिफारस स्थायी समितीपुढे करूया.

**मा. सभापती सो. :-**

आपल्याला सर्वसाधारण सभेला या विषयाबाबत शिफारस करायची आहे.

**जयंत पाटील :-**

शिफारस कशाला आणि कुणाच्या नावाने शिफारस करायची? कुठल्या रस्त्यासाठी? आम्हाला आधीच्या रस्त्यांची नावे द्या.

**दिपक खांबित :-**

रामदेव पार्क रस्त्याचे नाव श्री. आई माता मार्ग असे सुचविलेले आहे. त्यानंतर महाराणाप्रताप यशोदित बिल्डींगच्या कॉर्नरला जलाराम बापू चौक नाव येणार आहे. दुसरी गोष्ट म्हणजे शिवार गार्डन जवळ एक मंदिर आहे. ते तेथिल लोकांना काढायचे आहे.

**रतन पाटील :-**

ते आरक्षण मध्ये आहे.

**मा. सभापती सो. :-**

त्या लोकांनी आपल्याला जे आरक्षण दिलेले आहे. त्यांच्या देवीचे नाव श्री. आई माता आहे.

**दिपक खांबित :-**

मिरा रोड मधील दोन छोटे रस्ते आहेत.

**रतन पाटील :-**

आपण या विषयाला महासभेत मंजूरी घेउयाृ

**जयंत पाटील :-**

तुम्हाला हा प्रस्ताव महासभेत पाठवावा लागेल.

**मा. सभापती सो. :-**

मी हया प्रस्तावाबाबत महासभेत शिफारस करावी असे सांगतो.

**एस. ए. खान :-**

सुचना आणि दुरूस्ती सहीत ठराव मंजूर करण्यात यावाृ

**शशिकांत भोईर :-**

ओसवाल पार्क ते राहूल पार्कच्या एरियाचा समावेश करा.

**शशिकांत भोईर :-**

ओसवाल पार्क ते राहूल पार्क या रस्त्याला आर. व्ही. तळवळकर म्हणजेच कै. रामचंद्र विष्णू तळवळकर नाव दयायचे आहे.

**दिपक खांबित :-**

त्याला नाव ऑलरेडी दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्या रस्त्याला नाव दिलेले नाही.

**रतन पाटील :-**

श्री. खांबित यांनी तो रस्ता पूर्णपणे बंद करुन ठेवलेला आहे.

**हंसूकुमार पांडे :-**

तुम्ही प्रथम तो रस्ता खोलून दया.

**दिपक खांबित :-**

तिथे अजून रस्ता तयार व्हायचा आहे. आपण रस्ता तयार झाल्यानंतर रस्त्याला नाव देउया.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण नामफलकासाठी जे सिंमेटचे बोर्ड लावलेले आहे. ते काही ठराविक ठिकाणी तुटून पडलेले आहेत. आणि सडलेले वाकलेले आहेत. ते धोकादायक आहेत. काही ठिकाणी तुम्ही सर्व्हे करा. तुम्ही आमच्या वॉर्डमध्ये या मी तुम्हांला दाखवते ते तुम्ही त्वरीत काढून टाका आणि त्याठिकाणी नवीन घालावेल.

**प्रकरण क्र. ९४ :-**

रस्त्यांना नांवे देणेबाबत.

**ठराव क्र. ९६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत खालील रस्त्यांना नांवे देण्याबाबत मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे.

| अ.क्र | रस्त्याचे ठिकाण | रस्त्याचे नाव |
|---|---|---|
| १. | रामदेव पार्क रस्ता | श्री. आई माता मार्ग |

| अ.क्र | रस्त्याचे ठिकाण | रस्त्याचे नाव |
|---|---|---|
| २. | महाराणा प्रताप येथील यशोदिप बिल्डींग कॉर्नर | जलाराम बाप्पा चौक |
| ३. | प्रकाश मार्केट नारायण नगर क्रॉस रोड | मारूती मंदिर मार्ग |
| ४. | न्यु गोल्डन नेस्ट क्रॉस रोड | जैन मंदिर मार्ग |
| ५. | मिरा रोड शांतीनगर मधीन चौक | रामपियारी चौक |
| ६. | मिरा रोड शांतीनगर मधीन चौक | जुलेलाल चौक |

**सुचक :- श्री. जेन्वी आल्मेडा** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९५ चे वाचन केले.)
(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी आल्मेडा ह्यांनी ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

आपण पॅथॉलोजी करीता मागे निविदा काढलेली होती. तिथे श्री. सुनिल कृष्णा चौधरी, श्रीम. निता हर्षद पाटील, श्रीम. स्वाती रामचंद्र कदम प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची त्याच्यात नावे घेतलेली आहेत का?

**जेन्वी अल्मेडा :-**

त्यांची नावे घेतलेली आहेत.

**प्रकरण क्र. ९५ :-**

महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेल्या आरोग्य केंद्रासाठी लागणारे वैद्यकीय कर्मचारी वर्गाची करार पध्दतीने पाच महिन्यांच्या कालावधीसाठी नेमणूक करणे.

**ठराव क्र. ९७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि. १९.०४.२००३ मा. महासभा मंजूरीने शहरात एकूण सात आरोग्य केंद्र व एक फिरता दवाखाना सुरू आहे. मा. महासभा दि. १९.०४.२००३, विषय क्र. ५, ठराव क्र. ५ अन्वये आठ आरोग्य केंद्राकरीता खालील प्रमाणे वैद्यकीय कर्मचा-याची करार पद्धतीने नेमणूक करण्यात आली.

वैद्यकीय अधिकारी - ०८
परिचारिका - ०८
प्रसविका - २१
फार्मासिस्ट - ०८

यापैकी खलीलप्रमाणे वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, प्रसविका हे कर्मचारी वैयक्तिक कारणासाठी महापालिका सेवा सोडून गेलेले आहेत.

वैद्यकीय अधिकारी - ०३
परिचारिका - ०३
प्रसविका - ०५

वरीलप्रमाणे वैद्यकीय कर्मचा-यांची पदे तातडीने भरणेकरिता मुंबई संध्या, वृत्तमानस या वृत्तपत्रात दि. ०७.०७.२००६ रोजी जाहिरात देण्यात आली होती. तसेच महापालिका क्षेत्रात पॅथॅलॉजिकल लॅब सुरू करणे करिता मा. महासभेने दि. २०.०६.२००६ रोजी, ठराव क्र. २७ ने मंजुरी दिली असून याकामी आवश्यक ते तांत्रिक कर्मचारी नेमणूकीकरिता मंजुरी दिली होती. त्यानुसार 'नवशक्ती व सुरज प्रकाश' या वृत्तपत्रामध्ये दि. ०७.०७.२००६ रोजी जाहिरात देण्यात आली होती. देउन इच्छुक उमेदवारांना मुलाखतीसाठी दि. १६.०८.२००६ रोजी बोलाविण्यात आले. पात्र उमेदवारांच्या मुलाखतीत खालील प्रमाणे गठीत केलेल्या निवड समितीकडून घेण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुदामराव गायकवाड | महापालिका आयुक्त | अध्यक्ष |
| २. | श्री. बालाजी खतगावकर | उपायुक्त (मुख्यालय) | सदस्य |
| ३. | श्री. अजिज शेख | उपायुक्त (आरोग्य) | सदस्य |
| ४. | श्री. सुधीर नाकाडी | मुख्य लेखापरिक्षक | सदस्य |
| ५. | श्री. दिपक खांबित | कार्यकारी अभियंता | सदस्य |
| ६. | श्री. प्रमोद पडवळ | वैद्यकीय आरोग्य अधिकरी | - |

वरील निवड समितीने मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेउन खलील प्रमाणे शिफारस करण्यात आली.

१) वैद्यकीय अधिकरी
   ३) डॉ. ब्रिजेश पटेल
   ४) डॉ. दिलीप खेताडे

२) परिचारीका
   ३) श्रीम. स्मिता करवाली
   ४) श्रीम. जेन्वी रॉड्रीक्स

३) प्रसाविका
   ५) श्रीम. मनिषा मनोहर मोरे
   ६) श्रीम. ज्योती प्रशांत आंधळे

४) प्रयोगशाळा तंत्रज्ञ
   १) सुनिल कृष्णा चौधरी
   २) निता हर्षद पाटील
   ३) स्वाती रामचंद्र कदम

निवड समितीने शिफारस केलेल्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांची व प्रयोगशाळा तंत्रज्ञानाची ५ महिन्याकरिता करारपद्धतीने नेमणूक करणेकरिता मा. स्थायी समितीची मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जेन्वी आल्मेडा** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९६ चे वाचन केले.)

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

महापालिकेत वार्षिक भाडयाने वेळोवेळी जी वाहने लागतात. आपल्याकडे जे प्रभाग अधिकारी आहेत. यांच्याकडे वाहने नाहीत.

**जयंत पाटील :-**

आपण आतापर्यंत प्रभाग अधिकायांना वाहने का दिलेली नाहीत? ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

जी वाहने आहेत त्यांची मुदत वाढवायची आहे की नवीन वाहने घ्यायची आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याला नवीन वाहने घ्यायची नाहीत आणि नवीन वाहन घेण्याचा हा विषय नाही.

**जयंत पाटील : -**

आपल्याकडे एकूण अधिकारी किती आहेत? आणि वाहने किती आहेत?

**दादासाहेब खेत्रे :-**

आपल्याकडे महानगरपालिकेची एकूण ७५ वाहने आहेत. त्यापैकी ६३ वाहने चालू आहेत.

**रोहिदास पाटील :-**

ही महापालिकेची ७५ वाहने महापालिकेच्या मालकीची आहेत. त्यापैकी ६३ चालू आहेत आणि बाकीची बंद आहेत. असे तुमचं म्हणणे आहे का?

**दादासाहेब खेत्रे :-**

हो.

**जयंत पाटील :-**

ही सर्व वाहने आपली स्वतःची किंवा महापालिकेची आहेत का?

**दादासाहेब खेत्रे :-**

आपल्या महापालिकेची ७५ वाहने आहेत.

**रोहिदास पाटील :-**

भाड्याने किती वाहने आहेत?

**दादासाहेब खेत्रे :-**

भाड्याने आता घेतलेली आहेत.

**रोहिदास पाटील :-**

अधिकारी आणि पदाधिका-यांना भाड्याने किती वाहने दिलेली आहेत? अधिकारी भाड्याचाही गाडी वापरतात आणि महापालिकेचीही गाडी वापरतात.

**जयंत पाटील :-**

आता जी १२ वाहने बंद आहेत. ती कुठे आहेत?

**दादासाहेब खेत्रे :-**

आता सध्या आपल्याकडे भाड्याची एकून २४ वाहने आहेत.

**रतन पाटील :-**

कोणाकोणाकडे आहेत? अधिका-यांकडे आहेत का?

**दादासाहेब खेत्रे :-**

अधिकारी आणि पदाधिकारी यांच्याकडे आहेत.

**रतन पाटील :-**

आपण ही वाहने भाड्याने देतो. परंतु, आपण काही अधिका-यांना वाहन भत्ता दिलेला आहे. महापालिकेला वाहने घेणे परवडते की वाहन भत्ता देणे परवडते ते सांगा.

**जयंत पाटील :-**

आपण वाहन भत्ता किती दिलेला आहे? ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अधिका-यांना वाहन भत्ता रु. १३,५००/- आहे आणि पदाधिका-यांना वाहन भत्ता रु. १७,५००/- आहे. जी पदाधिकारी व अधिकारी स्वतःची गाडी वापरतात. आपण त्यांना वाहन भत्ता देतो. आपल्याकडे ज्या ७५ गाडया आहेत. त्या वाहन विभागातील डम्पर, ट्रक वगैरे सर्व मिळून संख्या सांगितलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

महापालिकेच्या मालकीच्या वाहनामध्ये एवढा कार आहेत. एवढया जीप आहेत असे निवेदन होणे आवश्यक आहे.

**रतन पाटील :-**

आपल्याकडे एकूण ६३ वाहने आहेत. ती वाहने कोणकोणत्या अधिका-यांना दिलेली आहेत. त्याचे निवेदन होणे आवश्यक आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी यापूर्वी त्या वाहनांच्या तक्ता सर्व सन्मा. सदस्यांना दिलेला आहे. मी तुम्हाला तो तक्ता परत देईन. आपल्याकडे एकूण किती वाहने आहेत? आपल्या विभागाची किती वाहने आहेत? ती वाहने कोणाकडे आहेत? आपल्याकडे त्याची संपूर्ण माहिती उपलब्ध आहे.

**रतन पाटील :-**

वाहन भत्ता द्या.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, तुम्ही अधिकारी व पदाधिका-यांना वाहने देण्यापेक्षा वाहन भत्ता दया. अधिकारी व पदाधिका-यांना वाहन भत्ता देणे नगरपालिकेला परवडेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आमचा वाहन भत्ता देण्याचाच प्रयत्न आहे. ब-याच अधिका-यांनी तसे सुरू केलेले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

बहुतेक सर्व अधिकारी व पदाधिका-यांनी स्वतःच्या गाडया आहेत.

**नगरसचिव :-**

आम्हाला ज्या दिलेल्या आहेत. त्या दोन वर्षापूर्वीचा वाहन भत्ता आणि पेट्रोलच्या दराने दिलेल्या आहेत. आजच्या घडीला वाहनभत्ता रु. १३,५००/- आहे. हे जे दर दिलेले आहेत. त्याच्यामध्ये एस.सी. साठी रु. १५ हजार दर आहेत. याच्यामध्ये पेट्रोल वगैरेचे दर ॲड करून दर दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही याची सांगड कुठे घातलेली आहे? ते सांगा. तुम्ही रु. ३६१ कोटीवरुन रु. १५० कोटीवर आले तुम्ही तुमच्या खर्चामध्ये कुठे काटकसर करणार आहात की नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

खर्च वाढत चाललेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला याचा व्यवस्थित अभ्यास करुन घ्यावा लागेल. तुमच्या आस्थापनेवरील खर्च्, तुमचा व्यक्तीगत खर्च, तुमचे खाणेपिणे या गोष्टींवर मर्यादा ठेवाव्या लागतील. या सर्व गोष्टीमुळे महापालिका बदनाम होत चाललेली आहे.

**रतन पाटील :-**

हे जे रेट दिलेले आहेत. ते ड्रायव्हर व डीझेल सहित दिले आहेत का?

**दादासाहेब खेत्रे :-**

हे रेट ड्रायव्हरसहीत दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आम्हाला सार्वजनिक कामांमध्ये लक्ष घालायला देत नाहीत आणि तुमच्या केबिनसाठी पैसे देता असे कसे? साहेब, हा वादाचा विषय आहे. हा सोपा विषय नाही. यावर प्रदिर्घ चर्चा व्हायला पाहिजे. आम्ही तुम्हांला विरोध करीत नाही याचा अर्थ तुम्ही एकतर्फी चाललेले आहात असाही होत नाही. तुम्ही सर्वसामान्यांना पैसा नाही म्हणून न्याय देऊ शकत नाहीत आणि तुम्ही सांगता महापालिकेच्या टॉप टू बॉटम सगळं लक्झरी चाललेले आहे असे कसे होईल. आता राजकोटला गेले ते सांगतात की मा. आयुक्तांना बसायलाही मोडकी खुर्ची आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

बरोबर आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील इसके उपर चर्चा होने देते सबको वाहन दे देकर नगरपालिका को खड्डे मे डालना है क्या?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणते अधिकारी वाहन वापरणार आहेत? आम्ही त्याची सुची सुद्धा अंतिम करतो. आम्ही ती सुद्धा स्थायी समिती पुढे सादर करु त्यात काही अडचण नाही. सर्वांना वाहने अनुज्ञेय नाहीत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ वगैरेपैकी कुठल्या अधिकाऱ्यांना वाहन भत्ता देणार आहात? ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या आत्तापर्यंतच्या ज्या कार्यान्वित प्रथा आहेत. त्याच्या बाहेर जाऊन कुणाला वाहन दिलेले नाही. आम्ही ते सुद्धा अंतिम केलेले आहे. त्याचे धोरण आपल्या पुढच्या सभेसमोर सादर करु.

**जयंत पाटील :-**

तेव्हा हा विषय आणा.

**रोहिदास पाटील :-**

सगळे वर्तमान पत्रकार खोटे छापतात असे समजू नका. एका पत्रकाराने म्हटले की, एक अधिकारी वाहन भत्ताही घेतो आणि गाडीसुद्धा घेतो असे योग्य आहे का? आम्हाला खोलात जायचे नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परंतु, आपल्याकडे हप्ता घेणारे व गाडी वापरणारे अधिकारी कोणीही नाहीत. जर असे पर्सनल कोणाचे नाव असेल तर आपण सांगूया. हा कम्लसरी खर्च आहे. हा प्लॅनिंगचा खर्च नाही. हा कमिटेड एक्सपेन्डिचर आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझे म्हणणे असे आहे की ज्या अधिकाऱ्यांना वाहनांची गरज आहे. त्या अधिकाऱ्यांनाच खर्च द्या.

**जयंत पाटील :-**

तुम्ही याबाबत सविस्तर माहिती द्या.

**रोहिदास पाटील :-**

आजच्या बैठकीला हा निर्णय घ्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

संपूर्ण माहिती आणून हा विषय पुढच्या मिटींगला घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे असलेली वाहने, वापरातील वाहने आणि वैयक्तिक वापरातील वाहने आम्ही तुम्हाला या सगळ्याला तक्ता देऊ.

**रोहिदास पाटील :-**

याचा तक्ता पुढच्या मिटींगला द्या. साहेब, आपण यांना मागच्या तारखेपासूनचा इफेक्ट देऊन माहिती देऊया. एकदा सर्व माहिती सविस्तर येऊ दे आणि त्यांना त्याप्रमाणे कामकाज करु दे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे सगळी माहिती तयार आहे. आपण आतासुद्धा सर्व माहिती मागवू शकतो. त्याच्यामध्ये काहीही प्रॉब्लेम नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही पाच दिवसानंतर दुसरी बैठक लावा. त्याप्रमाणे त्यांना काम करु दे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही कुठल्या अधिका-यांना गाडया देणार आहात याची संपूर्ण माहिती घेऊन या.

**मा. सभापती सो. (श्री. तुळशीदास म्हात्रे) :-**

अधिका-यांना गाडया दिलेल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही गाडयांचा फक्त ठराव मांडलेल्या आहे. परंतु, गाडया कुठे दिलेल्या आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणालाही नव्याने गाडया दिलेल्या नाहीत. ज्या गाडया गेल्या वर्षी चालू होत्या. आमच्याकडे आता त्याच गाडया उपलब्ध आहेत. ह्याच्यामध्ये नव्याने गाडया देण्याचे कोणतेही धोरण नाही.

**मा. सभापती सो. (तुळशीदास म्हात्रे ) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, आपण अगोदर गाडया दिलेल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी नव्याने गाडया देण्याचे धोरण नाही. त्या सर्व वापरातील गाडया आहेत. आता त्याचा कॉन्ट्रक्टर बदललेला आहे. आपल्याला त्याच्यामध्ये फायदा आहे.

**जयंत पाटील :-**

कोणकोणते अधिकारी गाडया वापरतात? ते तुम्हाला माहिती आहे का?

**मा. सभापती सो. (तुळशीदास म्हात्रे ) :-**

तुम्हाला त्याबाबतची माहिती अधिकारी देतील.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, तुम्हाला माहिती नसेल तर आम्हाला सुद्धा माहिती असू शकत नाही. तुम्ही माहिती घेऊन या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माझ्याकडे जे अधिकारी वाहने वापरतात. त्याची यादी उपलब्ध आहे. मी त्याचे झेरॉक्स काढून ती यादी सर्वांना देईन.

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी आल्मेडा ह्यांनी ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस्. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजूर आहे.

**प्रकरण क्र. ९६ :-**

निविदांना मंजुरी देणे. (वाहन विभाग)

**ठराव क्र. ९८ :-**

महानगरपालिकेने दि. १०-०६-२००६ रोजी दै. नवशक्ती व मुंबई संध्या या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर निविदा सुचनेनुसार वाहने वाहनचालकासह भाड्यानक घेण्याकामी खालिल ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ.क्र | तपशिल | विणा ट्रॅव्हल्स | | राज टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स | | सिताराम ट्रॅव्हल्स | | साई सिद्धी ट्रॅव्हल्स | | साई ब्रम्हा ट्रॅव्हल्स | | साईनाथ टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रती दिन | प्रती महिना | प्रती दिन | प्रती महिना | प्रती दिन | प्रती महिना | प्रती दिन | प्रती महिना | प्रती दिन | प्रती महिना | प्रती दिन | प्रती महिना |
| १. | मारूती इस्टीम (ए.सी.) | १,११२/- | २४,४४९/- | १,४५९/- | ३६,७८९/- | १,११५/- | २३,१११/- | १,०६४/- | २३,७४९/- | १,२६४/- | २५,७४९/- | ९९९/- | २२,०००/- |
| २. | मारूती ओमनी (नॉन ए.सी.) | ७४९/- | १४,१२४/- | ८४९/- | २२,१००/- | ७८६/- | १४,१५१/- | ६९०/- | १५,६४०/- | ७३५/- | १७,२९०/- | ६९९/- | १६,०००/- |
| ३. | टाटा इंडीगो (ए.सी.) | १,०५४/- | २४,१८२/- | १,४८९/- | ३५,६७९/- | १,११५/- | २३,१११/- | १,०६४/- | २१,९९०/- | १,२६४/- | २४,११०/- | ७६५/- | १८,९००/- |
| ४. | टाटा इंडीका (ए.सी.) | ९०५/- | १७,४८८/- | ८८९/- | १८,४८९/- | ८६१/- | १६,८८१/- | ७९०/- | १५,४९०/- | ८९०/- | १७,९९०/- | ६९०/- | १६,९९९/- |
| ५. | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | ७६५/- | १३,८८९/- | ७४९/- | १५,९८९/- | ७३५/- | १४,३५२/- | ७१०/- | १३,९००/- | ८१०/- | १४,९००/- | ६५०/- | १४,९९९/- |
| ६. | क्वालीस (नॉन ए.सी.) | १,०५०/- | १८,५४५/- | ९८९/- | २१,७८९/- | ७८६/- | १८,१११/- | ७७२/- | १५,६००/- | ८२४/- | १७,०००/- | ८४५/- | १८,४५०/- |
| ७. | क्वालीस (ए.सी.) | १,२०५/- | २१,५४८/- | १,२८९/- | २७,८८९/- | ९५१/- | २१,१११/- | ८७२/- | १८,६००/- | ९६९/- | १९,९००/- | ९०५/- | १९,५८०/- |
| ८. | टाटा सुमो / आर्माडा (नॉन ए.सी.) | ७२१/- | १४,१२४/- | ८४९/- | १६,४४९/- | ७२८/- | १४,१११/- | ६६२/- | १४,२५०/- | ७१०/- | १५,९००/- | ६८०/- | १५,२५०/- |
| ९. | ऑटो रिक्षा | ४२१/- | १२,६३६/- | ३४९/- | ११,४४९/- | ४५६/- | १३,४६१/- | ४३८/- | १२,२५०/- | ५२८/- | १४,२५०/- | २९०/- | ७,९९९/- |
| १०. | ऑटो रिक्षा (ध्वनीक्षेपणासह) | ६८९/- | २०,६७५/- | ५६९/- | १६,७८९/- | ५५५/- | १६,५२१/- | ७९०/- | १९,२५०/- | ९८०/- | २२,०००/- | ४७५/- | ९,९९९/- |
| ११. | टेम्पो (४०७) | १,०५२/- | २६,८५६/- | ९९९/- | ३१,९९९/- | १,११३/- | ३३,३९८/- | १,०४०/- | २९,९००/- | १,२४०/- | ३४,०००/- | ८५५/- | १७,९७५/- |
| १२. | टेम्पो (४०७) (ध्वनीक्षेपणासह) | १,२५२/- | ३४,५६५/- | १,१९९/- | ३६,९९९/- | १,१३३/- | ३३,९९८/- | १,३९०/- | ३४,६००/- | १,५६०/- | ३९,२००/- | १,१५५/- | १९,७६५/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता निविदेतील अनु.क्र.२ व ५ करिता प्रती माह करिता मे. विणा ट्रॅव्हल्स यांचे दर कमी आहेत तसेच अनु.क्र.८ करिता मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांचे प्रती दर माहकरिता कमी आहेत. तसेच अनु. क्र. २,६,७ व ८ यांचे दर प्रती दिन व अनु.क्र. ४,६ व ७ यांचे दर प्रति महिना मे. साई सिद्धी ट्रॅव्हल्स यांचे कमी आहेत. तसेच अनु.क्र. १,३,४,५,९,१०,११ व १२ करिता प्रति दिनचे दर व अनु.क्र. १,३,९,१०,११ व १२ यांचे दर मे. साईनाथ टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांचे दर सर्वात कमी आहेत. निविदेतील अटी-शर्तीनुसार अट क्र. ८ (अ व ब) नुसार मे. नारायणी ट्रॅव्हल्स, मे. हमिंग बर्ड बिझीनेस वेन्चर्स, श्री. चंद्रकांत मालवदे ह्यांनी निविदेती अटी-शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता न केल्याने सदर निविदा उघडण्यात आलेल्या नाहीत. तरी मे. साइर्नाथ टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स यांनी सादर केलेल्या निविदेतील दराची सरासरी पाहता त्यांचे दर सर्वात कमी आहेत.

उक्त निविदेमधील मे. साईनाथ टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांचे दर कमी असून यांनी निविदेसोबत सादर केलेले प्रमाणपत्र पडताळणी करीता राष्ट्रीय महामार्ग यांचेकडे पाठविण्यात आले आहे परंतु त्यांचेकडून कोणत्याही प्रकारची पडताळणी करुन कागदपत्रे आजतागायत या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाहीत तसेच मे. साईनाथ टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांनी दि. १८/८/२००६ रोजी कमी दराने काम करण्यास असमर्थ दर्शविणारे पत्राव्दारे कळविले आहे. करीता मे. साईनाथ टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांनी चुकीचे दर सादर करुन महानगरपालिकेची फसवणूक केल्याने त्यांना काळ्या यादीत टाकून त्यांची अनामत जप्त करण्यात यावी.

**सुचक :- श्री. जेन्वी आल्मेडा** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे हार्दिक आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०२.०० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**